www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 345 शनिवार दि. 30 ऑगस्ट २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

## शनिशिंगणापूर घोटाळ्यातील आरोपीवर प्रत्यक्ष कारवाई करा- संभाजी माळवदे

### आमरण उपोषण आंदोलनाचे पोलीस अधीक्षक यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**(नेवासा प्रतिनिधी)-**

शनिशिंगणापूर देवस्थान मधील बनावट अप अप घोटाळ्यातील आरोपीवर प्रत्यक्ष कारवाई करा अन्यथा शनीशिंगणापूर येथे पुन्हा बेमुदत उपोषण आंदोलन करण्यात येईल असे निवेदन अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले. शनिशिंगणापूर येथील जगप्रसिद्ध शनैश्वर देवस्थानमधे बनावट अप, बनावट क्यू आर, बनावट देणगी पुस्तक यामाध्यमातून येथील पुजारी, कर्मचारी, अधिकारी यांनी केलेल्या करोडो रुपयाच्या भ्रष्टाचाराची तसेंच कामगार भर्तीसह इतरही घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिले. पावसाळी अधिवेशनात तशी घोषणा देखील केली.ऑनलाईन घोटाळ्याची चौकशी पोलिसांच्या सायबर विभागातील पोलीस महासंचालक उ च च प द स्थ अधिकाऱ्यामार्फत तर इतर घोटाळ्याची चौकशी मुख्य धर्मदाय आयुक्त मुंबई कार्यालयामार्फत करण्याचे आदेश देण्यात आले. तपास यंत्रणाकडून पुजारी, कर्मचारी, मुख्य तक्रारदार यांची चौकशी करून जबाब नोंदविण्यात आले, विश्वस्तातांची देखील वकिला मार्फत सुनावणी झाली. या घटनेस तब्बल दोन ते तीन महिन्याचा मोठा कालावधी उलटूनही अदयाप प्रत्यक्षरित्या कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.त्यामुळे शनिभक्तांनी मोठी नाराजगी जाहीर केली. ज्या आवेशात सरकारने घोटाळ्याची चौकशी लावून पंढरपूर, शिर्डी याप्रमाणे शिंगणापूर देवस्थान सरकारी अमलाखाली आणून देवस्थानचा कारभार पारदर्शी करण्याचे सुतोवाच केले होते त्यास मोठा काळ उलटूनही घोटाळे बहाद्दरावर प्रत्यक्ष कारवाई न झाल्याने देशभरातील शनिभक्तांसह, नेवासा तालुक्यातील नागरिक, प्रामाणिक कर्मचाऱ्याचा हिरमोड होऊन सरकार व सरकारी यंत्रणावरचा विश्वास उडाला आहे शिंगणापूर देवस्थानमधील या घोटाळ्याचा सुरुवातीपासून पाठपुरावा करणारे, यासाठी दोनवेळा आमरण उपोषण आंदोलन करणारे महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे संभाजी माळवदे यांनी सरकारच्या बॉटचेप्या भूमिकेची गंभीर दखल घेत अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेऊन देवस्थानमधील घोटाळे बहाद्दरावर प्रत्यक्ष कारवाई करण्याची मागणी केली. तर तात्काळ कारवाईस सुरुवात न केल्यास शनिशिंगणापूर येथे पुन्हा हजारो शनिभक्तांसह आमरण उपोषण करण्याचा इशाराही यावेळी निवेदणाद्वारे दिला. यावेळी पोलीस अधीक्षक यानी लवकरच आठवडाभरात प्रत्यक्ष कारवाईस सुरुवात करण्यात येईल असे स्पष्ट केले. निवेदनावेळी कॉंग्रेसचे संदीप मोटे, अंजुम पटेल, छावाचे रावसाहेब काळे, आदी उपस्थित होते.

न्यायाच्या देवतेला न्यायाची प्रतीक्षा करण्याची वेळ ढिसाळ चौकशी यंत्रणा व सरकारमुळे आली असून देशभरातील शनिभक्तांचा या यंत्रणावरचा विश्वास उडत चालला आहे. आम्ही हिम्मत न हारता शेवटपर्यंत मोठा लढा देणार आहोत व शनिभक्तांना न्याय मिळवून देण्याबरोबरच त्यांच्या विश्वासाला कुठलाही तडा जाऊ देणार नाही - मा. संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी.

# आरक्षण द्यायचं, आंदोलन मोडायचं, की मला गोळ्या घालायच्या.

## मनोज जरांगे-पाटील यांचा थेट इशारा

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आझाद मैदानात उपोषण करणारे मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. आंदोलनासाठी एक-एक दिवसाची मुदतवाढ देण्याऐवजी मराठा समाजाला थेट आरक्षण देऊन टाकावे, असे परखड मत त्यांनी व्यक्त केले. मराठा समाजाला त्रास देऊन, त्यांच्या अन्न-पाण्याची सोय बंद करून मुंबईतून हाकलण्याचा सरकारचा डाव आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.




जरांगे म्हणाले, "सरकारने मला काल परवानगी दिली, आज पुन्हा एक दिवसाची मुदतवाढ दिली आहे. असले 'भंगार खेळ' खेळण्यापेक्षा सरकारने थेट मराठा समाजाला आरक्षण देऊन खरे राजकारण करावे. गोरगरिबांच्या मुलांना आरक्षण दिले, तर मराठा समाज आयुष्यभर सरकारला विसरणार नाही. मराठा समाजाचे मन जिंकण्याची हीच योग्य वेळ आहे."

**सरकार इंग्रजांपेक्षाही क्रूर**

आंदोलनादरम्यान आंदोलकांना होणाऱ्या त्रासावरही जरांगे यांनी बोट ठेवले. "मराठा समाजाच्या मुलांना लघवी करण्याचीही सोय नाही. वडापाव किंवा इतर खाद्यपदार्थांची दुकाने बंद करण्यात आली आहेत, पाण्याचीही सोय नाही. मराठ्यांनी कंटाळून मुंबई सोडून जावे, असा यामागे डाव आहे," असे ते म्हणाले. यावर बोलताना त्यांनी सरकारला "तुम्ही इंग्रजांपेक्षाही क्रूर झाला आहात" अशा शब्दांत फटकारले.

जरांगे यांनी सरकारला थेट इशारा दिला. "मराठा समाजाची मुले माज घेऊन आलेली नाहीत, तर वेदना घेऊन आली आहेत. मी उपोषण करून मेलो तरी चालेल, पण या मुलांसाठी दुकाने बंद ठेवू नका. अन्यथा, तुमची आमच्याकडे सभा झाली तर आम्हीही पाणी बंद करू, दुकाने बंद करू," असा इशारा जरांगे यांनी दिला.

**आता लढाई आरपारची !**

'ही लढाई आता आरपारची आहे, आम्ही मागे हटणार नाही. एकतर सरकारला आरक्षण द्यावं लागेल किंवा उपोषण करुन मी तरी मरेन, पण आता मागे हटणार नाही. आता फक्त आरक्षण नाही, तर त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय मी आंदोलन मागे घेणार नाही', असं मनोज जरांगे-पाटील म्हणाले.

## डोंबिवलीच्या स्वस्तिक कला केंद्राच्या ४१ वर्षाची अखंडित परंपरा, भारतीय सशस्त्र सीमा बलाचा ( मोरया ) थेट जम्मू काश्मीरला विराजमान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वार्ताहर**

गणपती बाप्पा निघाले डोंबिवलीहून थेट जम्मू- काश्मीरला आणि तेही थाटात विमानाने. आमच्या श्रीमूर्ती देश-विदेशी पोहोचल्या आहेत. यावर्षी आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला तो म्हणजे श्री गणेशाची स्थापना जम्मू- काश्मीर भारतीय आर्मी सशस्त्र सीमा बल कॅम्पमध्ये अत्यंत उत्साह आणि जल्लोषात पार पडला. बाप्पाची सुंदर मूर्ती सर्वांच्या मनाला भावली. हे शक्य झाले ते डोंबिवलीच्या स्वस्तिक कला केन्द्र मधुन सुंदर आणि मनमोहक अशी बाप्पाची मूर्ति भेटल्यामुळे. आमच्या बटालियन सशस्त्र सीमा बल आणि संपूर्ण कैंपच्या सैनिक, फौजी कढून डोंबिवली स्वस्तिक कला केंद्राचे भरभरून आभार मानत आहे. यावर्षी आम्हाला सशस्त्र सीमा बल (भारतीय सेना) जम्मु- काश्मीर यांच्यामुळे गणेश चतुर्थीच्या उत्सवामध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली. अशा प्रतिष्ठित व्यासपीठावर आपला सांस्कृतिक वारसा आणि प्रतिभा प्रदर्शित करणे हा आमच्यासाठी खूप अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. आमच्या कलात्मक अभिव्यक्तींद्वारे एकता आणि अभिमानाचा संदेश पसरवण्याची संधी आणि सीमेवर मोरयाचे विराजमान झाल्याबद्दल सर्वांनी मेजर गणेश चव्हाण यांचे आभार मानले आहेत. जय हिंद !




## ऐथेल गॉर्डन अध्यापिक विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्स्फूर्तपणे साजरा.

**दैनिक युवक आधार**
**पुणे प्रतिनिधी**

रास्ता पेठ येथील ऐथेल गॉर्डन अध्यापिक विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन विद्यार्थ्यांच्या उपस्थित उत्स्फूर्तपणे साजरा करण्यात आला,

यावेळी प्रमुख पाहुणे माजी मुख्याध्यापक अमर बनसोडे व माजी मुख्याध्यापक दत्तात्रेय अरकडे यांनी घेण्यात आलेल्या कार्यक्रमात मेजर ध्यानचंद यांच्या जीवन कार्याची माहिती शाळेतील विद्यार्थ्यांना समजावून सांगितले, यावेळी शाळेचे मुख्याध्यापिका शिल्पा पंडित, शाळेच्या शिक्षिका मनीषा गडकरी आदि यावेळी उपस्थित होते, यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांचे खेळ घेण्यात आले,





गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवाजीनगर (गव्हाण) येथे ठाकूर कुटुंबियांच्या निवासस्थानी श्री गणरायाची प्रतिष्ठापणा करण्यात आली असून लाडक्या गणरायाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सपत्नीक पूजन केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्यासह सर्व ठाकूर कुटुंबानेही लाडक्या गणपती बाप्पाचे पूजन केले.
(दैनिक युवक आधार)

## शतायुषी परंपरा असलेल्या केंद्रांकडून अनोख्या थीम्सद्वारे श्रद्धा आणि वारसा उजागर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

टाटा पॉवरच्या खोपोली व भिरा जलविद्युत केंद्रात यंदा गणेशोत्सव भक्तीभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. खोपोली व भिरा या दोन्ही शतायुषी परंपरा असलेल्या केंद्रांनी अनोख्या थीम्सद्वारे श्रद्धा आणि वारसा उजागर केला. खोपोली जलविद्युत केंद्रात केदारनाथ थीमवर सजवलेले देखावे विशेष आकर्षण ठरले. या माध्यमातून श्रद्धा आणि जलविद्युत वारशाच्या शंभर वर्षांहून अधिक परंपरेला उजाळा देण्यात आला.तर भिरा जलविद्युत केंद्रात गडाच्या थीमवर सजवलेला देखावा साकारण्यात आला होता. ऐतिहासिक वारशाला उजाळा देणारा हा उपक्रम भाविकांना आकर्षित करणारा ठरला. धार्मिक भावनेची ताकद आणि ऐतिहासिक प्रेरणेची जाणीव या दोन्हींचा संगम साधत, टाटा पॉवरच्या केंद्रातील गणेशोत्सवाने श्रद्धा, संस्कृती आणि वारशाची उज्ज्वल परंपरा पुढे चालवली.





## कृत्रिम तलावाला नागरिकांचा प्रतिसाद; दीड दिवसांच्या ८३ टक्के मूर्त्यांचे विसर्जन कृत्रिम तलावात

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले संपादक**

**वसईः** गणेशमूर्ती विसर्जनासाठी महापालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावांना नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला. मागील वर्षीच्या तुलनेत मूर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जनाचे प्रमाण हे वाढल्याचे दिसून आले. यावर्षी दीड दिवसांच्या एकूण १३ हजार ६८२ गणेशमूर्ती विसर्जनापैकी ११ हजार ४४८ गणेशमूर्तीचे विसर्जन हे पालिकेच्या कृत्रिम तलावात करण्यात आले. म्हणजेच एकूण ८३ टक्के विसर्जन हे कृत्रिम तलावात झाले. यंदाच्या वर्षीही पालिकेने पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर दिला आहे. विसर्जनासाठी ११६ इतके कृत्रिम तलाव उभारण्यात आले होते. या कृत्रिम तलावाला चांगला प्रतिसाद मिळाला असून मोठ्या प्रमाणात गणेशमुर्त्या या कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आल्या. बाप्पाला निरोप देण्यासाठी वसई-विरार शहरातील अनेक ठिकाणच्या विसर्जनस्थळी मोठी गर्दी केली होती. यंदाही पालिकेने तलावात होणारे प्रदूषण व तलावांचे संवर्धन व्हावे या उद्देशाने विसर्जनासाठी कृत्रिम तलावांचे हौद तयार केले होते. त्यातही अनेक नागरिकांनी पुढाकार घेत विसर्जन केले. शहरात दीड दिवसांच्या १३ हजार ६८२ मूर्त्यांचे विसर्जन पार पडले त्यातील ११ हजार ४४८ गणेशमूर्त्या या कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आल्या. त्याचप्रमाणे विसर्जनस्थळी नागरिकांच्या सोयीसाठी मंडप व्यवस्था, आरती स्थळे, दिवाबत्ती सोय, मूर्ती संकलन केंद्र, निर्माल्य कलश, वैद्यकीय मदत कक्ष आदि आवश्यक सर्व उपाययोजना महापालिकेमार्फत करण्यात आल्या होत्या. शुक्रवारी पहाटे सहापर्यंत गणेशमूर्ती विसर्जन करण्यात आले. यंदाही दगडखाणीतील विसर्जनासाठी कन्व्हेअर बेल्टची सुविधा महापालिकेने उपलब्ध केली होती. कन्व्हेअर बेल्टच्या सहाय्याने विसर्जन करणे अधिक सोयीस्कर ठरले, वेळेची बचत झाली आणि कमी मनुष्यबळात विसर्जन पार पडले.गणेशभक्तांच्या मदतीसाठी महानगरपालिकेचे कर्मचारी, पोलीस विभागाचे कर्मचारी, स्वयंसेवक तैनात ठेवण्यात आले होते. महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी स्वतः विसर्जनस्थळी भेट देऊन विसर्जनाच्या नियोजनाची पाहणी केली, तसेच दोन्ही अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिकेचे सर्व उप-आयुक्त, सर्व सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख, अग्निशमन कर्मचारी आणि इतर कर्मचारी वर्ग प्रभागनिहाय विसर्जन स्थळी हजर राहून विसर्जन प्रक्रिया व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

**दिड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन २०२५**
**कृत्रिम तलाव**
**घरगुती – ११३९३, सार्वजनिक - ५५,एकूण - ११४४८**
**नैसर्गिक स्त्रोत, जेटी**
**घरगुती – २२०१,सार्वजनिक – ३३, एकूण - २२३४**




प्रसिद्ध इंग्लिश नियतकालिक 'सिटी बेल' यांच्या गणेशोत्सव विशेषांकाचे लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या शुभहस्ते प्रकाशन संपन्न झाले. समूह संपादक मंदार दोंदे आणि समूह संपादक विवेक पाटील संपादित इंग्रजी विशेषांकचे प्रकाशन करताना रामशेठ ठाकूर यांनी या संपादक जोडीचे अभिनंदन केले. तसेच वाचनीय लेख प्रसिद्ध केल्याबद्दल कौतुक देखील केले.



आदरणिय दाभाडे साहेब अपर आयुक्त नागपूर याची आज गणेशोत्सव शहराचा बंदोबस्ता संदर्भात महत्त्वाची विषयावर चर्चा केली दैनिक युवक आधार विदर्भ संपादक सतीश कडू नागपूर

## विंचूर येथे सामूहिक श्रावणी उपकर्म प्रयोग उत्साहात संपन्न

### विंचूर-लासलगाव येथील ब्राह्मण बांधवांनी एकत्र येऊन केले ऋषीपूजन

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण निफाड प्रतिनिधी**

**विंचूर** – धार्मिक परंपरेला साजेसा उत्साह आणि श्रद्धा यांचे दर्शन घडवत विंचूर येथील श्रीराम मंदिरात सामूहिक श्रावणी उपकर्म प्रयोग व ऋषीपूजनाचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने पार पडला. विंचूर आणि लासलगाव परिसरातील ब्राह्मण बांधवांनी एकत्र येऊन या धार्मिक विधीत सहभाग नोंदवला.

श्रावणी प्रयोग हा यज्ञोपवीत (जाणवे) धारण करणाऱ्या विप्रांसाठी एक महत्त्वाचा धार्मिक विधी मानला जातो. याला श्रावणी उपकर्म असेही संबोधले जाते. या दिवशी आत्मशुद्धी, विधी नूतनीकरण आणि वेदारंभाचे संस्कार पार पाडले जातात. कार्यक्रमात पंचगव्य स्नान, ऋषी-तर्पण, सप्तऋषी पूजन व यज्ञोपवीत परिवर्तनाचे विधी विधिवत पार पडले. उपस्थित सर्वांनी भविष्यात सत्कर्म करण्याची प्रतिज्ञा केली.

या धार्मिक विधीसाठी पौरोहित्याची जबाबदारी दीपकशास्त्री कुलकर्णी यांनी निभावली, तर ब्राह्मण भोजनाचे नियोजन अशोक अग्निहोत्री यांनी केले होते. धार्मिक वातावरणात मोठ्या संख्येने उपस्थित झालेल्या विंचूर-लासलगाव येथील विप्र बांधवांनी या सामूहिक श्रावणी प्रयोगाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमामुळे समाजात एकोपा, अध्यात्मिक उन्नती आणि धार्मिक परंपरांचा गौरव अधोरेखित झाला.

## लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नागरिकांना मोफत गणपतीचा शिधा वितरित

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

दानशूर व्यक्तिमत्व, रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक चेअरमन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गव्हाण जिल्हा परिषद गट आणि उलवे नोड भारतीय जनता पार्टीच्या वतीने गणेशोत्सव तसेच गौरी-गणपतीच्या पार्श्वभूमीवर परिसरातील हजारो नागरिकांना मोफत गणपतीचा शिधा वितरित करण्याचा कार्यक्रम गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा तिथीनुसार अमृतमहोत्सवी वाढदिवस असल्याने मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल आणि गुलाबाचा महापुष्पहार घालून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.




लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त पनवेल-उरण परिसरात वर्षभर विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. गुरुवारी त्यांचा तिथीनुसार अमृत महोत्सवी वाढदिवस असल्यामुळे त्यांच्या संकल्पनेतून परिसरातील हजारो रहिवाशांना आणि गोरगरिबांना मोफत गणपतीचा शिधा वाटप करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, आपल्या जीवनात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील, जनार्दन आत्माराम भगत आणि माता-पित्यांच्या संस्कार व आशीर्वादांमुळेच आपण घडलो आहोत असे सांगून सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या आणि भावी जीवन आनंदमयी व सुखी-समृद्ध होवो अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार महेश बालदी, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्राध्यापक डॉ. सदाशिवराव कदम आणि साई संस्थान वहाळचे अध्यक्ष रवीशेठ पाटील यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्राध्यापक डॉक्टर सदाशिवराव कदम, जे.के. जाधव, भाजपचे ज्येष्ठ जे.एम.म्हात्रे, भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, दिवंगत दि.बा.पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, रवीशेठ पाटील, भाऊशेठ पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाणच्या माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, योगिता भगत, उषा देशमुख, कामिनी कोळी, नरेश मोकल, गणेश पाटील, सचिन घरत, माजी उपसरपंच अमर म्हात्रे, विश्वनाथ कोळी, जितेंद्र म्हात्रे, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, गव्हाण विभागीय अध्यक्ष निलेश खारकर, धीरज ओवळेकर, वितेश म्हात्रे, शैलेश भगत, निकिता खारकर, भाऊ भोईर, राजेश म्हात्रे, मिनाक्षी पाटील, सुहास भगत, सुधीर ठाकूर, मदन पाटील, अनुप भगत, अंकुश ठाकूर, किशोर पाटील, सचिन राजे येरूणकर, अखिलेश यादव, अवधेश महतो, वहाळ पंचायत समिती भाजपा अध्यक्ष वितेश म्हात्रे, युवा मोर्चा गव्हाण विभागीय अध्यक्ष शनिकुमार पाटील, मंडळ उपाध्यक्ष सुहास गोंधळी, जयवंत देशमुख, हेमंत ठाकूर, रतनशेठ भगत, शैलेश भगत, मदन पाटील, दीपक गोंधळी, अडव्होकेट सुनिल मौर्या, मनोज मोर्या, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, सहायक विभागीय अधिकारी विजयराव जगताप, प्रिया शिंदे, संगीता कांबळे, अशा पाटील., अंकुश ठाकूर, अवनीश सिंह, रवी शिंदे, प्रणय कडू, नासिर खान, प्रतिश पाटील, निलेश खोत, विराज देशमुख, विनायक कोळी, समीर मढवी, देवालय मित्रा, गणेश पाटील, वनिता बाबर, अभिमन्यू दापोलकर, प्रवीण ठाकुर, हरी घरत, सागरशेठ ठाकुर, मुख्याध्यापक कारंडे सर, संतोष गुजर यांच्यासह सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

## निशब्द : मन हेलावून टाकणारे दृश्य,

### शेतकऱ्याचे सारं कष्ट "पाण्यात"



:शेतकऱ्यांचा आक्रोशः
"आम्ही पिकांसाठी कर्ज काढले, खतं टाकली, परंतु आता सगळं पाण्यात गेलं. सरकारने तरी आमचं ऐकावं" – असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सूर्यकार**

धर्माबाद तालुक्यासह परिसरात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सलग पडणाऱ्या पावसामुळे शेतातील सोयाबीन, कापूस, उडीद, तूर या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून काही ठिकाणी पिके पूर्णपणे पाण्याखाली गेली आहेत.

पावसामुळे शेतजमिनीमध्ये पाणी साचून राहिल्याने उगवलेली पिके कुजण्याची भीती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी खूप कष्टाने घेतलेली पिके डोळ्यादेखत नष्ट होत असल्याने बळीराजा हताश झाला आहे.

शेतकरी संघटनांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. दरम्यान, तालुका प्रशासनाने पिकांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले असून पुढील दोन दिवसांत अहवाल सादर होणार असल्याची माहिती मिळाली आहे.

गेल्या दोन दिवसांत तालुक्यात सरासरी १२५ मिमी पाऊस झाला. यामुळे निचऱ्याचा अभाव असलेल्या शेतजमिनीत पाणी साचून राहिले आहे. "पिके बुडाली, कुटुंबाच्या उपजीविकेवर गदा आली" असे हताश स्वरात शेतकरी सांगत आहेत.



गणपती बाप्पाची स्थापना चतुर्थी तिथीला दुपारी होते, त्यानंतर दुपारी विसर्जन करण्यात येते, त्यामुळे याला दीड दिवसात गणेश विसर्जन असे म्हटलं जातं, असे सांगतात की दीड दिवासांच्या गणपती विसर्जन आणि शेती यांचा संबंध आहे गणेश चतुर्थीपर्यंत धान्याची पाती शेतात दिसतात तेव्हा धरणी मातेचे आभार मानण्यासाठी तिथे गणपती तयार करून त्याची पूजा केली जाते प्राणप्रतिष्ठा केलेला हा बाप्पा दीड दिवसानंतर आपल्या घरी जातो म्हणजे त्याचे नदीत समुद्रामध्ये तलावामध्ये विसर्जन केले जाते

## श्रीष्टी येथील कसूरा नदीवरील पुलावरून नागरिकांना करावी लागते जीवघेणी कसरत...

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

परतूर जवळील श्रीष्टी गावा जवळून कसूरा नदी वहात आहे, थोडा जरी पाऊस झाला की या नदीवरिल पुलावर पाणी लगेच वाढते आणि नाईलाजाने नागरिकांना व वाहनांना जीवघेणा प्रवास करावा लागतो.मागील इतिहास जर पहिला तर दोन वर्षांपूर्वी याच पुलावरून एक बस वाहून गेली होती. तरी देखील प्रशासनाला अजून पर्यंत जाग आली नाही, गाढ झोपलेल्या प्रशासनाला कधी जाग येणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. श्रीष्टी जवळील याच कसूरा नदीवरून शेगाव- पंढरपूर हायवे गेला आहे, त्या नदीवर मोठा पूल बांधण्यात येत आहे, परंतु त्या पुलाच देखील काम बंद पडलेल आहे, त्या मुळे नागरिकांना याच जुन्या पुलाचा नाईलाजास्तव वापर करावा लागत आहे. बाजारपेठ असलेल आष्टी,माजलगाव तसेच परतूर तालुक्यातील बऱ्याच खेड्यापाड्यांचा पुलावर पाणी आले



की परतूर तालुक्याशी संपर्क तुटून जातो. त्यामुळे जनजीवन विस्कळून जाते. या नदीवरील पुलाचे काम कधी पूर्ण होणार अशी चर्चा येथील नागरिकांमध्ये आहे. या नदीवरील पूल लवकरात लवकर बांधून हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी व नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित दादा पवार गटाचे सामाजिक न्याय विभागाचे जालना जिल्हा उपाध्यक्ष सदाभाऊ शिरसाट, सामाजिक न्याय विभागाचे परतूर तालुका अध्यक्ष प्रभाकर प्रधान, तालुका कार्याध्यक्ष प्रवीण मोरे व ओ.बी.सी. सेलचे जालना जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत दवंडे हे लवकरच प्रशासनाला भेटून या संबंधी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी आमचे प्रतिनिधी अशोक ठोके यांच्याशी बोलताना सांगितले आहे.

## वयोवृद्ध शेतकऱ्याची कर्जबाजारीपणाला कंटाळून गळफास लावून आत्महत्या

### चिंचोली शिवारातील घटना

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**



**राळेगाव:-** एका वयोवृद्ध शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना राळेगाव तालुक्यातील चिंचोली शिवारात गुरुवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी सकाळी ७ च्या दरम्यान उघडकीस आली.मारोती गणपत आत्राम वय ५८ वर्ष राहणार आठमुर्डी असे गळफास लावून आत्महत्या करणाऱ्या वयोवृद्ध शेतकऱ्याचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार आठमुर्डी येथील मारोती आत्राम यांचे चिंचोली शिवारात शेत आहे,शेती कामानिमित्त ते पहाटेच्या दरम्यान शेतात गेले होते.अचानक मारोती आत्राम यांचा मुलगा राहुल आत्राम हे शेतामध्ये फवारणी करण्याकरिता गेला असता त्याचे वडील रोहिणीच्या झाडाला गळफास लावून असल्याचे दिसले. त्याने ही माहिती वडकी पोलिसांना दिली तात्काळ घटनास्थळी बीट जमादार अमोल चौधरी यांनी घटनास्थळाला भेट दिली व मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी राळेगाव येथे पाठविण्यात आला आहे.मृतक मारोती आत्राम यांचेकडे आठ एकर शेती असून त्यांचेवर दोन लाखाचे कर्ज असल्याचे कुटुंबांनी सांगितले

मारुती आत्राम यांचे पश्चात पत्नी,एक मुलगा दोन मुली व नातवंड असा आप्तपरिवार असून या घटनेचा पुढील तपास वडकी पोलीस स्टेशन करीत आहे.

## दिबा समर्थकांच्या योध्यांनी नवी मुंबई विमानतळाच्या कार्यालयावर दिली धडक ..

### पहिल्या टप्प्यातील नोकर भरती प्रकल्पग्रस्तांचीच व्हावी.. विजय शिरढोणकर

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर**

दि.२९ ऑगस्ट रोजी सकाळी 11 च्या सुमारास नवी मुंबई एअरपोर्ट अदानी गेट वर दिबा समर्थक भूमिपुत्र विजय शिरढोणकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो प्रकल्पग्रस्त स्थानिक ग्रामस्थांनी प्रचंड आक्रोश व असंतोष व्यक्त करत विमानतळ प्राधिकरण विभागाचे लक्ष वेधले. लोकनेते दिबा समर्थकांच्या योध्यांनी ऐन सणासुदीच्या काळात भर पावसात नोकर भरतीच्या प्रक्रियेतील पहिल्या टप्प्यावर आक्षेप घेत जोरदार घोषणाबाजी करत, नवी मुंबई विमानतळ कार्यालया ठिकाणी मोठा जमाव केलेला होता. यावेळी स्थानिक भूमिपुत्रांमध्ये गठ तट निर्माण करत राजकारण करणाऱ्या सत्तेतील भाजपच्या पदाधिकाऱ्याची माहिती देण्यात आली तसेच संघर्ष समिती म्हणून गाव प्रकल्पग्रस्त पातळीवरील संघटनेच्या कृती वर अविश्वास हि व्यक्त करण्यात आला. आमचा उद्देश भूमिपुत्रांना न्याय देणे आहे ,आम्हाला आमचं स्वार्थ नाही असे म्हणत प्रलंबित व विलंब होत असलेल्या नोकर भरती, नामकरण मुद्द्यावर सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत भाजप



पक्षाचा राजीनामा देणारे दि बा कट्टर समर्थक विजय शिरढोंणकर व अनेक अजी ,माजी लोकप्रतिनिधी, स्थानिक भूमिपुत्रांनी यावेळी नोकर भरती प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप होत असून अश्या मुद्द्यावर छुपा राजकारण होत आहे असे सांगितले .या विमानतळ प्रकल्पात आमदारांची एक इंच देखील जमीन गेलेली नाही. भूमिपुत्रांना डावलण्याचा प्रकार कोणी करत असतील तर दिबांच्या आंदोलनाची पुनरावृत्ती केली जाईल असे हि सांगण्यात आले .अदानी समूहाने नेमलेल्या कंपन्यांनी नोकरी देताना ८०% अधिकृत प्रकल्पग्रस्तच भरावे त्यांनी तसे नाही केल्यास त्यांना तात्काळ बदलण्यात यावे असे हि ठमकावून सांगण्यात आले .सरकारला आमच्या भूमिपुत्रांच्या लोकभावना समजाव्यात म्हणून आम्ही आज पर्यंत विविध पध्दतीने दि बा समर्थक लोकशाही च्या मार्गाने सरकार पर्यंत निवेदन, मागणी करत आहोत, आज परत एकदा गणेश उत्सवाच्या निमित्ताने आम्ही अंतिम सूचना वजा इशारा देत गणेश मूर्ती आणि पुष्प देऊन प्रार्थना करून आपल्या सहकार्याची अपेक्षा करत आहोत, हा प्रकल्प अजून अपूर्ण असून अनेक सोयी सुविधांपासून वंचित आहे. या सर्व प्रकल्पासाठी अतोनात त्रास प्रकल्पग्रस्तांनी अनेक वर्षे सहन केलेला आहे . नोकरीसाठी संधी प्रथमता विस्थापित दहा गावांतील तरुणांना द्यावी त्यानंतर २७ गाव, नैना व ९५ गावांतील इतर उमेदवारांचा विचार करावा असे अदानी समूहाच्या अधिकारी नवी मुंबई विमानतळ मानव संसाधन विभाग प्रमुख पूनम डावरे यांना उपस्थित शिष्टमंडळाने विनंतीपूर्वक सांगितले. मुंबई विमानतळाच्या ठिकाणचे अनुभवी कामगार आपण येथे आणत असाल आणि प्रकल्पग्रस्तांना नाम मात्र घेत असाल तर संघर्ष निर्माण होण्यासाठी आपणच कारणीभूत असाल असे हि सांगण्यात आले. आमच्या मागण्या हक्क ,अधिकाराच्या आहेत त्या मान्य केल्या गेल्या नाहीत, तर आजपासून आम्ही या लढ्यात अधिक तीव्रतेने उतरणार आणि लढा रक्तरंजित बलिदानातून भूमिपुत्रांना न्याय दिल्याशिवाय राहणार नाही असे विजय शिरढोणकर यांनी सांगत सर्व उपस्थित अधिकारी , प्रकल्पग्रस्तांचे व मान्यवरांचे आभार मानले.

## ऐन सणासुदीला नारळ महाग; गणेशभक्त व नागरिकांचे गणित बिघडले

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



"मोदक, मिठाई, नैवेद्य सर्वत्र लागतो नारळ, पण भावाने पायऱ्या चढल्या".कोकणात सण-उत्सव नारळाशिवाय अपूर्ण मोदक, मिठाई, श्रीफळासाठी नारळ हवा, पण दरवाढीमुळे घरखर्च डळमळला.कोकणात गणेशोत्सव म्हणजे भावभावनांचा, श्रद्धेचा, कुटुंबाच्या ऐक्याचा आणि पदार्थांच्या चवीचा सण. पण या सणाच्या मध्यवर्ती ठरणाऱ्या नारळाच्या भावाने मात्र यंदा नागरिकांचे गणित बिघडवले आहे.गेल्या काही दिवसांत नारळाच्या किंमतींमध्ये लक्षणीय वाढ झाली असून छोटा नारळ आता ४५ ते ५० रुपयांपर्यंत तर मोठा नारळ तब्बल ६५ ते ७५ रुपयांना विकला जात आहे. सणासुदीपूर्वी हेच दर अनुक्रमे ३५ ते ४० व ५० ते ६० रुपये होते. एवढेच नाही तर सुके खोबरेसुद्धा ५०० ते ७०० रुपये किलो या भावाने विकले जात असून सामान्यांच्या खिशाला मोठा चटका बसत आहे.

कोकणी संस्कृतीत नारळाचे महत्त्व कोकणात नारळाशिवाय जेवणाची कल्पनाच करणे कठीण आहे. घराघरांत रोजच्या स्वयंपाकात नारळाचा वापर होतोच. त्याचबरोबर सणासुदीच्या दिवसांत मोदक, नारळाच्या मिठाया, नारळी पाक, विविध भाजीपाला व पदार्थांमध्ये नारळ हा मुख्य घटक ठरतो. गणपती बाप्पाला नैवेद्य अर्पण करतानासुद्धा नारळ अपरिहार्य आहे. मंदिरांत श्रीफळ म्हणून नारळाचा वापर होत असतो. पुढे येणाऱ्या नवरात्रोत्सवातही नारळाची मागणी वाढणार असल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे. * झाडांची घट आणि शहरीकरण * पूर्वी कोकणात प्रत्येक घरासमोर नारळाचे झाड हे अभिमानाचे मानले जात होते. पण वाढते शहरीकरण, सिमेंटची घरं, बांधकामांची झपाट्याने होत असलेली वाढ यामुळे नारळाची झाडं कमी होत चालली आहेत. परिणामी बाजारात मागणी पुरवठ्याचे प्रमाण बिघडले असून त्याचा फटका भाववाढीच्या रूपाने जनतेला बसत आहे."जनतेत चर्चेचा विषय"

सणासुदीच्या काळात नारळ महाग झाल्याने बाजारपेठेत व नागरिकांमध्ये नारळाच्या किंमतींबाबत चर्चेला उधाण आले आहे. "गणपती बाप्पाच्या नैवेद्यासाठी नारळ घ्यावाच लागतो, किंमत कितीही असो", अशी श्रद्धाळू भाविकांची भूमिका आहे. पण सर्वसामान्य कुटुंबांना मात्र या भाववाढीची झळ प्रकर्षाने जाणवत आहे.


**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR** Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# तेली समाज एकत्रित व संघटना मजबूत असणे ही काळाची गरज... मा.खा.रामदास तडस.

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू a नागपूर विदर्भ संपादक**

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभे च्यावतीने नागपूर जिल्ह्यातील समाजातील प्रांतिकचे प्रमुख पदाधिकारी, ज्येष्ठ सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते यांची आढावा सभा नुकतीच समाजाचे जवाहर वस्ती गृह, सिव्हिल लाइन्स नागपूर येथे नुकतीच संपन्न झाली. पुढे होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुका लक्षात घेता या सभेनी समाजातील कार्यकर्त्यांमध्ये जागृती व चैतन्य निर्माण करण्याचा संघटनेचा प्रयत्न होता. या सभेच्या अध्यक्षस्थानी प्रांतिकचे राज्य अध्यक्ष माजी खासदार रामदासजी तडस होते. सभेला प्रामुख्याने राज्य महासचिव डॉ. भूषण कर्डिले, राज्य कार्याध्यक्ष गजानन शेलार, राज्य कोषाध्यक्ष बळवंतराव मोरघडे, राज्यउद्योग आघाडी अध्यक्ष पोपटराव गवळी, राज्य युवाआघाडी अध्यक्ष अतुल वांदिले, कार्याध्यक्ष नंदकिशोर दंडारे यांनी मार्गदर्शन केले. सभेचे प्रास्ताविक नागपूर विभाग अध्यक्ष जगदीश वैद्य व संचालक नागपूर विभाग युवा आघाडी अध्यक्ष प्रवीण बावनकुळे व शिवकुमार सावरकर यांनी केले तर आभार नागपूर जिल्हा




युवा अध्यक्ष पुष्कर डांगरे यांनी मानले. सभेचे आयोजक नागपूर शहर अध्यक्ष किशोर भिवगडे व ग्रामीण अध्यक्ष रमेश कारेमोरे होते. सभेत विविध राजकीय पक्षांनी समाजाला काय दिले, समाजाची जिल्ह्यात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक काय परिस्थिती आहे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी श्री शेखर सावरबांधे यांचे नेतृत्वात नवनिर्वाचित जवाहर विद्यार्थी गृहाचे कार्यकारी मंडळ सदस्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष पदावरून मार्गदर्शन करताना माजी खा. श्री रामदासजी तडस यांनी सांगितले की, समाज संघटनेच्या जोरावरच मला दोनदा आमदार व दोनदा खासदार होता आले. तुम्ही ज्या क्षेत्रात, पक्षात कार्यरत आहात, तिथे आपले कर्तृत्व दाखवून आपले स्थान मजबूत करा. शक्ती दाखवा संघटना आपल्या पाठीशी राहील. त्यासाठी तुम्हाला आपले वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून प्रांतिक संघटनेच्या माध्यमातून एकत्र येऊन संघटन मजबूत करावे लागेल. हिच काळाची गरज आहे. त्याशिवाय समाजाला कोणी विचारणार नाही. संघटनेच्या प्रखर रेट्यामुळे विद्यमान सरकारने संताजी आर्थिक विकास मंडळ दिले, जातीय जनगणना ची मागणी पूर्ण झाली. ओबीसी ला न्याय मिळवून देण्यासाठी लढा उभा केला पाहिजे. यासाठी प्रांतिक महासभा राज्यभर जिल्हावार आढावा बैठका घेऊन समाजात जागृती करून पुढे होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुकीत समाजाला जास्तीत जास्त प्रतिनिधित्व कसे मिळेल यासाठी प्रयत्न करेल. तसेच आर्थिक विकास मंडळाला पाचशे कोटी भांडवल मिळावे यासाठी सरकारकडे प्रांतिकचा पाठपुरावा सुरू आहे. सध्या पन्नास कोटी मिळालेत. ते समाजाचे लोकसंखेच्या मानाने फार अपुरे आहेत. यातून समाजातील युवकांना रोजगार व उद्योगासाठी आर्थिक मदत करता येईल. या समाजाच्या सर्व मागण्या राज्य व केंद्रातील सरकार निश्चितपणे पूर्ण करेल ही खात्री आहे. याप्रसंगी त्यांनी नागपूर जिल्ह्यात काँग्रेस पक्ष समाजावर कसा अन्याय करते हे सांगताना श्री बाबा आस्टनकर सारख्या एवढ्या मोठ्या कर्तुत्वान नेत्याला ते तेली म्हणून त्यांना जास्त काळ संधी न देता ताबडतोब जिल्हाध्यक्ष पदावरून काढून टाकले. अनेक सक्षम नेते असतानाही मागील विधानसभेत एकालाही उमेदवारी दिली नाही. यापूर्वी शिक्षक मतदार संघात शब्द देऊनही राजेंद्र झाडे यांना पाठिंबा काँग्रेसने दिला नाही. असे खच्चीकरण सुरू आहे.

हे तरुणांनी ओळखले पाहिजे. याप्रसंगी त्यांनी समाजभूषण महसूल मंत्री श्री.ना.चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिमंडळात महत्वाचे स्थान व आमदार श्री कृष्णाभाऊ खोपडे याची नागपूर सुधार प्रन्यास चे विश्वस्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन व राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांचे आभार व्यक्त केले. या सभेला प्रामुख्याने राजेंद्र झाडे, सौ. प्रदनाताई बडवाईक, सौ. नयना झाडे, सौ. कल्पना संजय इखार, पुष्कर डांगरे, शुभम लोहकरे, राकेश भावालकर, गजानन दांडेकर, सौ. मंगलाताई मस्के, सौ. सविता कुल्लरकर, हरिश्चंद्र दहाघने, डॉ. प्रभाकर खंडाईत, डॉ. निखिल भुते, रमेश उमाटे, केशवानंद सूरकर, सुभाष ढबाले, किशोर वरभे, विलास गभणे, देवेंद्र काळबांडे, प्रमोद क्षीरसागर, गोपाळ इटणकर, खुशाल तलमले, सुधाकर चन्ने, गणेश गाडेकर, चेतन देशमुख, योगेश मस्के, सौ.जयश्री गभने, मंजू कारेमोरे, नंदिनी वासुरकर, सारिका ताटे, करुणाताई आस्तनकर, वंदनाताई साठवने, नीलिमा वाघमारे, सुरेश रेवतकर, गजानन लांजेवार, ईश्वर धनजोडे, सुधाकर पडोळे, राम जूमले, चंद्रभान मेहर आदी तसेच मोठ्या संख्येनी समाज बंधू भगिनी हजर होते.

## कृत्रिम तलावात विसर्जन केलेल्या मूर्तींचे विटंबन, टायगर गावातील ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे बृह मुंबई महानगर पालिकेचा पर्दाफास.

**दैनिक युवक आधार,**
**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी.**

दि.३०,डायघर(ठाणे):दरवर्षी नैसर्गिक तलावामध्ये प्रदूषण होऊ नये म्हणून प्रत्येक नगरपालिका महानगरपालिका यांच्याकडून लोकांना कृत्रिम तलावात मूर्ती विसर्जन करण्याची आव्हाहन करण्यात येते मागील काही वर्षांपासून लोकही या आव्हाहानाला प्रतिसाद देऊन मोठ्या प्रमाणात कृत्रिम तलावात मूर्तीचे विसर्जन करीत असतात या वर्षी सुद्धा २८ तारखेला दीड दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन कृत्रिम तलावात मोठ्या प्रमाणात करण्यात आले पण ह्या मूर्तींचे योग्य रीतीने विल्हेवाट न लावता बृहन्मुंबई महानगरपालिकेने थेट या मुर्त्या डायघर येथील डम्पिंग ग्राउंड मध्ये आणून टाकण्याचे कृत्य केले. ही बाब जेव्हा डायघर गावातील श्री.योगेश लक्ष्मण पाटील यांच्या निदर्शनास आली तेव्हा त्यांनी त्वरित ही गोष्ट विश्व हिंदू परिषद जिल्हा मंत्री श्री.रवींद्र गणेश पाटील,बजरंग दलचे प्रखंड संयोजक श्री.प्रवीण शांताराम पावशे, माजी नगरसेवक श्री.बाबाजी बाळाराम पाटील आणि डायघर गावचे श्री.संतोष नारायण पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली या सर्वांनी त्वरित डायघर येथील डम्पिंग ग्राउंड मध्ये जाऊन तेथील अधिकाऱ्यांना मूर्ती डम्पिंग ग्राउंड मध्ये टाकून कुठल्याही प्रकारे मूर्तींची विटंबना होता कामा नये असा इशारा दिला असे झाल्यास सर्व हिंदू समाजाकडून उग्र असे आंदोलन करण्यात येईल. नागरिकांचा आणि बजरंग दलाचे कार्यकर्त्यांचा रौद्ररूप आणि वाढता रोज पाहून डम्पिंग ग्राउंड मध्ये टाकण्यात येणाऱ्या मृत्यूचा विसर्ग त्वरित थांबवण्यात आला आणि येथे आलेल्या सर्व गाड्या वापस पाठवण्यात आल्या.



## कालिकादेवी महाविद्यालयात मेजर ध्यानचंद यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार (प्रतिनिधी)**

येथील कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विभाग यांच्या वतीने मेजर ध्यानचंद यांची जयंती क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात आली. तसेच यावेळी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कर्मचारी सचिव डॉ.नवनाथ पवळे, डॉ. श्याम सानप, डॉ. अशोक घोळवे डॉ.रमेश लाहोटी,,डॉ.राज कोरडे, डॉ. उद्धव चौधर, संदीप संपाळ, तसेच महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.



## इंद्रराज महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** दिनांक 29 ऑगस्ट 2025 रोजी सिल्लोड येथील इंद्राराज महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. क्रीडा दिनानिमित्त संस्थेचे सचिव माननीय श्री. अशोक जी देवरे हे उपस्थित होते व त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व व खेळातून होणारे फायदे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.व्ही. बी. लांब यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स कोट्यातून महाविद्यालयात प्रवेश घेण्याची माहिती सविस्तर दिली .

त्याचप्रमाणे महाविद्यालयात विविध खेळांचे आयोजन करण्यात आले त्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.एम.बी.इंगळे संचालक शारीरिक शिक्षण विभागातर्फे करण्यात आले तसेच या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## उरण तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी JNPA चा मोठा हातभार, १६ शाळांना लॅपटॉपचे वाटप.

**दैनिक युवक आधार ।**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर. उरण रायगड.**

उरण तालुक्यात शुक्रवार दिनांक २८ जून २०२५ रोजी

रोजी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवघर येथे JNPA च्या CSR फंडातून CDROME EDUCATION SOCIETY या संस्थेच्या माध्यमातून उरण तालुक्यातील १६ शाळांना लॅपटॉपचे वाटप करण्यात आले.यामध्ये नवघर,पागोटे, भेंडखळ, जसखार, फुंडे, सावरखार, करळ, कुंडेगाव, सोनारी, जासई, चिर्ले, रांजणपाडा, धुतूम, नवीन शेवे, हनुमान कोळीवाडा, बोकडवीरा या शाळांचा समावेश आहे.

सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते गणेश पूजन तसेच सरस्वती पूजन करण्यात आले. नंतर नवघर शाळेच्या वतीने सर्व मान्यवरांचे शाल व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच सर्व उपस्थित शिक्षकांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.यावेळी अध्यक्ष

विजय वासेकर आणि गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. लवकरच निर्मला घरत मॅडम यांच्या प्रयत्नातून सर्व शाळांना कपाट ,टेबल या प्रकारचे साहित्य प्राप्त होणार आहे.कार्यक्रमाच्या वेळी सर्वांना चहा पाण्याची व्यवस्था तसेच सर्व कार्यक्रमाचे आयोजन नवघर शाळेचे कार्यतत्पर शिक्षक अनिल म्हात्रे सर यांनी केले.कार्यक्रमाच्या वेळी उरण तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सन्मा निर्मला घरत मॅडम,संस्थेचे अध्यक्ष सन्मा.विजय वासेकर , सन्मा. प्रकाश मानकर, केंद्रप्रमुख प्रविण पाटील, केंद्रप्रमुख दिलिप पाटील,राजा पाटील ,अनंत पाटील,कौशिक ठाकूर,तसेच लाभ मिळणाऱ्या शाळांचे मुख्याध्यापक,

शिकक प्रतिनिधी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महेश गावंड सर यांनी केले तर आभार भरत पाटील यांनी मानले. एकंदरीत JNPA ने जिल्हा परिषद शाळांकरिता दिलेल्या लॅपटॉप चा उपयोग चांगल्या प्रकारे करण्यात येईल अशा आश्वासन प्रत्येक शिक्षकांनी दिले आणि JNPA प्रशासनाचे आभार व्यक्त केले.





## तळणी : महामार्गावर भरधाव कार उलटली; एकजण जखमी

**दैनिक युवक आधार**
**उप संपादक राजु शिंदे.**

शेगांव–पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावर वडगाव सरहद्द ( ता . मंठा ) फाट्यावरील पुलाजवळ गुरुवारी (ता. २९) सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास भरधाव वेगात असलेली स्विफ्ट डिझायर (क्र. MH-01 BK 7757) कार खड्ड्यात उलटली. या अपघातात कारमधील जालना येथे कार्यरत लघु पाटबंधारे उपविभागीय अधिकारी आर व्ही शेळके (३८) हे जखमी झाले आहे. अपघातानंतर संबंधितांना तळणी येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले.



## मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी विविध देशांच्या महावाणिज्य दूतांनी

### घेतले गणेश दर्शन, मनोभावे आरतीही केली

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,संतोष पाटील**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी विविध देशातील महावाणिज्य दूतांनी गणेशाचे दर्शन घेत मनोभावे आरती केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती अमृता फडणवीस यांनी सर्व महावाणिज्य दूतांचे स्वागत केले. मुख्यमंत्र्यांसोबत सुमारे ३५ महावाणिज्य दूतांनी सहकुटुंब आरतीत सहभाग घेतला.

फ्रान्सचे जीन मारे सेरे चार्लेट, ब्रिटीश उच्चायुक्तालयाचे राजकीय प्रमुख जॉन निकेल, मलेशियाचे अहमद झुवारी युसूफ, साउथ कोरियाचे डाँगवान यू, ब्राझिलचे जाओ दे मेंडोन्का लिमा नेतो, बांग्लादेशच्या श्रीमती फरहाना अहमद चौधरी, इंडोनेशियाचे इडी वॉरडोयो, यूएईचे अब्दुल्ला हुसेन अल्मारझुकी, अर्जेंटिनाचे डॅनिअल क्यूर कन्फलोनिरी, श्रीलंकेचे प्रियंगा विक्रमसिंघे, इजिप्तचे दहिला तवाकोल, फिनलंडच्या इवा निल्सन, पोलंडचे थोमाझ, कतारचे अहमद साद अल सुलैती, मॉरिशसचे दुशांत बक्तोवार, इसराईलचे कोब्बी शोशनी, जपानचे कोजी यागी, युएसएचे मायकेल स्क्रेन्डर, टर्कीचे मुस्तफा केमालटीन युगूर, पनामाचे रॉबेटो रॉड्रिग्ज प्रडा, इराकचे झुहायर साद अब्बास, कुवेतचे शाये अबू शायबा, ऑस्ट्रेलियाचे पौल मुर्फी, आर्यलँडचे टॉम नूनन, नेदरलँडचे नाबील तौती, बेलारूसचे अलिकसंदर मत्सूको, स्पेनचे जॉर्ज डी लुकास कॅडेनास, थायलंडच्या थितीपॉर्न चुचीन्नावट, स्वीडनचे उपमहावाणिज्य दूत जोकीम गुन्नारसन, स्विझर्लँडचे मॅथिअस कोएग्ल, सौदी अरेबियाचे सुलेमान ईद अलोतैबी, इटलीचे वॉल्टर फेरारा, मेक्सिकोच्या अड्रिना विल्लानेवा, चीनचे क्वीन जी, जर्मनीचे क्रिस्टोफ रेंडटॉर्फ, सिंगापूरचे जेरम वाँग, बहरिनचे अली अब्दुल अझीज अल बलुशी यांच्यासह अफगाणिस्तानचे महावाणिज्य दूत यांनी सहकुटुंब आरतीत सहभाग घेतला.

गणेश दर्शन, आरतीनंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि श्रीमती अमृता फडणवीस यांनी सर्वांची वैयक्तिक विचारपूस करीत चर्चा केली.

# बालसंगोपन संस्थांतील मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी "मासूम"

### मुख्यमंत्र्यांच्या संवेदनशील निर्णयामुळे ३,३३७ मुलांना लाभ

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू नागपूर विदर्भ संपादक**

मुंबईः राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये (Child Care Institutions - CCI) राहणाऱ्या समस्याग्रस्त आणि विधी संघर्षीत मुलांना मानसिक आरोग्यसेवा व समुपदेशन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग एमपॉवर संस्थेच्या माध्यमातून "मासूम" प्रकल्प राबवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे या प्रकल्पाचा आजपर्यंत ३,३३७ मुलांना लाभ झाला असून एकूण ९५९३ वैयक्तिक समुपदेशन सत्रे पार पडली आहेत.

महाराष्ट्रातील महिला व बालविकास विभाग (WCD) राज्यातील बालकल्याण व मानसिक आरोग्याच्या कार्याला बळकटी देण्यासाठी, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या Mpower या उपक्रमामार्फत 'मासूम' प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पांतर्गत अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना, जे बाल संगोपन संस्थांमध्ये (Child Care Institutions – CCIs) राहतात, त्यांना मानसिक आरोग्य सेवा व समुपदेशन (counselling) पुरवले जाते. हा सार्वजनिक-खाजगी भागीदारीचा उपक्रम, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे.

सेवेची भावना या उद्देशाने व बांधिलकीने Mpower व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा, श्रीमती नीरजा बिर्ला यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून १८० दशलक्षाहून अधिक लोकांपर्यंत पोहोचून, Mpower हे दक्षिण आशियातील मानसिक आरोग्य साक्षरता, क्षमता-वृद्धी आणि सामुदायिक संपर्कावर लक्ष केंद्रित करणारे सर्वांत मोठे खासगी व्यासपीठ ठरले आहे.

महिला व बालविकास विभाग (WCD) सोबतच्या फेब्रुवारी २०२३ मधील सामंजस्य करारानंतर हा प्रकल्प मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर आणि नाशिक या विभागांमध्ये राबवला जात आहे. एकूण १९ बालसंगोपन संस्थांना पाच मानसशास्त्रज्ञाच्या टीमकडून सेवा दिल्या जात आहेत. या प्रकल्पांतर्गत मानसशास्त्रज्ञ रोटेशन पद्धतीने सीसीआयला भेट देतात, स्तिथीपरत्वे समुपदेशन करतात, मुलांचे मानसिक आरोग्य स्क्रिनिंग करतात आणि गरजेनुसार थेरपी सेवा पुरवतात. याशिवाय गंभीर प्रकरणांमध्ये बालकल्याण समिती (CWC) आणि किशोर न्याय मंडळाला (JJB) तज्ज्ञांचे सहकार्य दिले जाते. थेरपिस्ट काही मुलांच्या आरोग्य आणि मानसिक परिस्थितीनुसार त्यांचे तणाव मापन पट्टी (Stress Scale), आक्रमकता मापन पट्टी (Aggression Scale), स्थिती-गुणधर्म चिंतामापन चाचणी (State Trait Anxiety Test), मानसिक आरोग्य व कल्याण मापन पट्टी (Psychological Well-Being Scale) यांसारख्या साधनांद्वारे सखोल परीक्षण केले जाते. मुलांच्या कुटुंबियांनाही समुपदेशनाची सुविधा दिली जाते. पालकांचे समुपदेशन केल्याने , मुले घरी परतल्यावर त्यांना पुर्वीप्रमाणे मोकळे वातावरण मिळेल हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. मासूम प्रकल्प हा राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये मानसिक आरोग्य सेवांना बळकटी देणारा ठरला असून मुलांच्या पुनर्वसन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

या प्रकल्पासंदर्भात Mpower व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा नीरजा बिर्ला म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या मानसिक आरोग्याला दिलेले प्राधान्य हे दूरदर्शी नेतृत्वाचे द्योतक आहे. या सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे Mpower चे कार्य म्हणजे अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना त्वरित ट्रॉमा रिलिफ व सर्वसमावेशक मानसशास्त्रीय आधार देणे. प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांच्या मदतीने विद्यमान प्रणालीला बळकटी देऊन मुलांच्या पुनर्वसन व समाजात पुन्हा समावेशक होण्यासाठी सुरक्षित व सहाय्यकारी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## कंत्राटदाराने रस्त्याच्या कामासाठी काढला रस्त्यालगतच मुरूम कंत्राट दाराविरोधात चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

कंत्राटदराने रस्त्याच्या कामासाठी काढला रस्त्यालगतच मुरूम कंत्राट दारा विरोधात चौकशीची मागणी

यावाबत मिळालेल्या माहितीनुसार वाघाड ते उमराळे बुद्रुक प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्त्याचे काम चालू असताना रस्त्याची साईट पट्टा भरण्यासाठी कंत्राटदाराने रस्त्याच्या कडेलगतच गटारीतून मोठे प्रमाणात माती (मुरूम) काढल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

त्यामुळे रस्त्याचे बाजूला मोठ प्रमाणात खड्डेच खड्डे झाले आहे सहा ते सात फूट खोल व 30 फूट लांब तसेच दहा ते बारा फूट रुंदीचे खड्डे अगदी रस्त्याच्या कडेलाच तयार झालेले असून रस्त्याने ये जा करणाऱ्या मालवाहू गाड्यांसाठी अतिशय धोक्याची ही बाब आहे.



प्रवाशांसाठी तर जीवित हानी होण्याची दाट शक्यता टाळता येणार नाही त्यामुळे सदर कंट्रकदार यांना जिथे जागीच माती व मुरूम काढण्यासाठी कोणत्या अधिकाऱ्याने परवानगी दिली याची स्थानिक प्रशासनाने चौकशी करून परवानगी देणारा अधिकारी वर्ग व कंत्राटदार यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी याबाबत दिंडोरी तहसीलदार यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिंडोरी तालुका अध्यक्ष श्री नामदेव भाऊ गावित व सतीश मालसाने, पांडुरंग गावंडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ रमणलाल बडजाते यांना बीड जिल्हा भूमिपुत्र पुरस्कार

## -राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते वितरण-

**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार**
येथील प्रसिद्ध असलेले डॉ रमणलाल बडजाते यांना 'बीड जिल्हा भूमिपुत्र' पुरस्कार देऊन गौरवण्यात आलेले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे राजस्थानचे राज्यपाल मा. श्री. हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.



बीड जिल्ह्यातील समाजकारण, प्रशासन, शिक्षण आणि उद्योग आदि क्षेत्रांमध्ये कार्यरत राहुन जिल्ह्याच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या अद्वितीय कार्यासाठी लोकमत समूहाकडून हा पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २३ ऑगस्ट रोजी लोकमत भवन' छत्रपति संभाजीनगर येथे शनिवारी पार पडला. यावेळी माजी मंत्री तथा एडिटर इन चीफ–लोकमत मीडिया मा. श्री. राजेंद्र दर्डा यांचीही उपस्थिती होती. बीड भूमिपुत्र पुरस्कार' मिळाल्याबद्दल डॉ. रमनलाल बडजाते यांचे शिरूर कासार शहरासह संपूर्ण तालुक्यातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# गोपाल पाटील राऊत यांचा जन्मदिवस रामदेव बाबा यांच्या सानिध्यात हरिद्वार येथे साजरा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी रणजीत सिंह ठाकुर**
विविध विषयावर केली चर्चा वाशिम साठी योग भवन उभारण्याची केली विनंती

मालेगाव 29 ऑगस्ट भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी पंचायत समिती सदस्य युवा उद्योजक गोपाल पाटील राऊत यांचा जन्मदिवस योग गुरु रामदेव बाबा हरिद्वार येथे त्यांच्या सानिध्यात साजरा करण्यात आला 22 ऑगस्ट ते 30 ऑगस्ट पर्यंत सात दिवस गोपाल पाटील राऊत यांनी सपत्नीक योग गुरु रामदेव बाबा यांच्या सानिध्यामध्ये



हरिद्वार येथे आहार विहार योग या विषयाचे धडे घेतले असून रामदेव बाबांनी त्यांना भरपूर वेळ दिला आणि विविध विषयावर त्यांच्याशी कुटीमध्ये बसून चर्चा केली. गोपाल पाटील राऊत यांनी सुद्धा अनेक टीव्ही चॅनलला मुलाखती दिल्यात त्यांनी रामदेव बाबा कडून आहार विहार योग या विषयावर अनेक चर्चा करून त्यांच्याकडून प्रशिक्षण घेतले त्या प्रशिक्षणाचा लाभ ते जिल्ह्यामध्ये देणार आहेत असा मनोदय त्यांनी व्यक्त केला त्याचप्रमाणे वाशिम मध्ये योग भवन व पंचकर्म प्रक्रिया चालू करण्यासाठी बाबा रामदेव यांना गोपाल पाटील राऊत यांनी विनंती केली त्यांनी लगेच त्या विनंतीची नोंद घेऊन त्यांचे ओएचडी यांना सूचित केले की वाशिम मध्ये यांच्या संपर्कात राहून जागेची पाहणी करा वाशिम मध्ये योगभवन सुरू झाल्यास अनेक साधकांना त्याचा लाभ होणार आहे गोपाल पाटील राऊत यांनी सात दिवसाच्या प्रशिक्षणामध्ये त्यांनी विविध पंचकर्म प्रक्रिया आहार प्रक्रिया योग प्रक्रिया या विषयावर त्यांनी प्रशिक्षण घेतले त्यांच्या प्रशिक्षणाचा लाभ हे जिल्ह्यातील तमाम लोकांना होणार आहे याप्रसंगी त्यांनी प्रस्तुत प्रतिनिधी बोलताना सांगितले की पाच हजार एकराच्या निसर्गरम्य वातावरणामध्ये प्रत्येक व्यक्तींनी हरिद्वार येथे एक वेळ जाऊन तिथला अनुभव घ्यावा शरीराच्या प्रत्येक आरोग्यावर इथे निदान केल्या जाते शुगर बीपी कोलेस्टार ब्लॉकेज अशा संपूर्ण आजारावर येथे उपचार केले जातात देशामध्ये सगळ्यात मोठ नेचरोपॅथी पंचकर्म केंद्र हे बाबा रामदेव यांच्या स्वानित्यात हरिदास येथे उपलब्ध आहे त्यामध्ये एवढी चांगली व्यवस्था आहे की देशपातळीवर अशी व्यवस्था कुठल्याही आयुर्वेदिक संस्थेमध्ये नाही त्यांचा जन्मदिवस अतिशय उत्साहामध्ये ते दरवर्षीप्रमाणे बाबा रामदेव यांच्या सानिध्यामध्ये साजरा करतात सर्व साधकांनी आहार विहार योग या विषयाकडे लक्ष देऊन आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे यासाठी बाबा रामदेव यांच्याकडून ते धडे घेतले आणि ते इतर लोकांना शिकवणार असा मनोदय गोपाल पाटील राऊत यांनी व्यक्त केला त्यांच्यासोबत ओमप्रकाश गट्टानी हे सुद्धा प्रशिक्षणासाठी उपस्थित होते

# महाराष्ट्र ब्राम्हण सभेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी महेश सारणीकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक :- राजू शिंदे**



महाराष्ट्र ब्राम्हण सभा ही स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचाराने प्रेरित झालेली संस्था असून देशभरात ह्या संस्थेचे काम चालते. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री अतुलजी व्यास तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री मयुरेश अरगडे कार्याध्यक्ष श्री चैतन्य जोशी व सर्व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार करण्यासाठी माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री महेश सारणीकर यांची महाराष्ट्र ब्राम्हण सभेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

संस्थेच्या माध्यमातून ब्राम्हण समाजाच्या अडीअडचणी सोडवत समाजाला न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहतील ही अपेक्षा ठेवत त्यांच्या कार्याची दखल घेऊन ही मोठी जवाबदारी संस्थेने त्याच्यावर सोपवली आहे. श्री महेश सारणीकर यांच्यासारखे निर्भीड पदाधिकारी संस्थेने निवडले आहेत की जे सर्वसामान्य ब्राम्हण समाजाच्या व्यथा – समस्या ह्या सरकार पर्यंत पोहचवून समाजाला योग्य दिशा दाखवत समाजाला न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी सदैव प्रामाणिक प्रयत्न करतात. ब्राम्हण समाजाला पुढे नेत समाजातील बेरोजगार तरुणांना रोजगारीच्या संधी उपलब्ध करून देऊन एक भक्कम नेतृत्व करत समाजाला पुढे नेण्याचं काम श्री महेश सारणीकर ह्या महाराष्ट्र ब्राम्हण समाजाच्या वत्तीने करतील अशी अपेक्षा आहे.

श्री महेश सारणीकर हे प्रथमपासूनच सामाजिक कार्यात सहभागी आहेत, माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आहेत, ज्यामार्फत समाजातील सर्वच स्तरातील अडी अडचणी सोडवत, लोकांना समितीच्या माध्यमातून पाठबळ मिळवून देवून प्रशासकीय, सामाजिक विकास, माहिती अधिकार, पत्रकारिता त्याबरोबर पोलिस प्रशासन आणि जनता यांचा समन्वय या पाचही क्षेत्रात प्रभावीपणे समितीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांचे हात कायम बळकट करून सामाजिक भावनेतून कार्य करत आलेले आहेत.

त्यांच्या पुढील वाटचालीस माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीचे सर्वच पदाधिकारी, मित्र परिवार, ब्राम्हण समाजातील अनेक मान्यवर मंडळींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# लोकोपयोगी कामावर कौतूकाची थाप ;लखनभैय्या ठाकूर गौरव पुरस्काराने सन्मानित !

**तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**
वाशिम : भारतीय जनता पक्षाचे एकनिष्ठ, सक्रिय आणि धडाडीचे कार्यकर्ते, नेते लखनभैय्या ठाकूर यांच्या लोकोपयोगी कार्याची दखल घेत त्यांना नुकतेच 'लोकमत गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

लखनभैय्या ठाकूर हे सामाजिक, शैक्षणिक व शेतकरीहितासाठी सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. ते भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष असून, त्यांनी यापूर्वी पक्षातील जिल्हा उपाध्यक्ष, प्रदेश सदस्य, प्रदेश सचिव अशा अनेक जबाबदाऱ्या यशस्वीरित्या सांभाळल्या आहेत. २०१५ मध्ये त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यप्रवणतेवर आधारित 'मी पाहिलेले मुख्यमंत्री' हे पुस्तक लिहून मोठी प्रशंशा मिळवली होती.



त्यांच्या कार्यामध्ये रिसोड तालुक्यामध्ये शेतकरी बांधवांच्या हिताकरिता व शेतकरी बांधवांची जीवन सुजलाम सुफलाम होण्याकरिता पैनगंगा नदीवर बॅरेजेस व्हावे जलसंपदा विभागाकडे मागील अनेक वर्षापासून पाठपुरावा सुरू आहे तसेच वाशिम जिल्ह्या मध्ये जलक्रांती व्हावी या उद्देशाने वैनगंगा–पैनगंगा नदी प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचा समावेश व्हावा यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता महाराष्ट्रातील सोलर योजनांना विदर्भात चालना देण्यासाठी प्रयत्न, तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी केलेले उपक्रम विशेष उल्लेखनीय आहेत.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत तसेच भारतीय जनता पार्टी मार्फत जनकल्याण योजना चा प्रचार व प्रसार जनतेपर्यंत पोहोचण्याची कामे करण्याकरिता ते नेहमीच धडपड करत राहिले आहेत. ओला दुष्काळ असो वा कोरडा दुष्काळ, तसेच शेतकरी बांधवांना शेतकरी पीक कर्ज तात्काळ भेटायला पाहिजे तसेच, शेतकऱ्यांच्या कल्याणाची रोजगार हमी योजना अंतर्गत असलेली विहीर सिंचन योजने मध्ये वाढ व्हावी या करिता पालकमंत्री सह रोजगार हमी योजना म्हणतील मंत्री कडे पाठपुरावा करणे ,शेतकरी बांधवांना पिक विमा मिळण्याकरिता प्रयत्न असो किंवा शेतकऱ्यांना २४ तास वीज मिळावी, त्यांना शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी त्यांनी मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला.


'लोकमत गौरव पुरस्कार' सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून लखन ठाकूर यांचे योगदान अधोरेखित करत, त्यांच्या कार्याचा गौरव व्यक्त केला.


लोकमत गौरव पुरस्कार लोकमत गौरव पुरस्कार कार्यक्रमांमध्ये रिसोड मालेगाव मतदार संघाचे आमदार अमितजी झनक आमदार चैनसुख संचेती आमदार मनोज कांयदे अकोला जिल्हाअधिकारी वर्षा मीना मॅडम अकोला पोलीस अधीक्षक अर्चित जी चांडक मराठी सिने अभिनेत्री ऋतुजा बागवे सह लोकमत युनिट चे मुख्य आलोक शर्मा लोकमत समाचार चे मुख्य प्रभारी अरुण जी सिन्हा सह बुलढाणा व वाशिम जिल्हा लोकमत पत्रकार बांधव वार्ताहर व लोकमत पुरस्कार्थी तसेच लखनसिंह ठाकुर यांच्या परिवारातील त्यांच्या सहचरणी सौ, मेघा ठाकूर कु मीनल ठाकूर दर्शन ठाकूर सह मित्र मंडळी हजर होते.


# गणपती आहे बुद्धीची देवता, तिची आराधना करावी सर्वदा


**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**
भाद्रपद महिन्यातला पवित्र सण गणेशोत्सव जल्लोषात साजरा केला जातो, भाद्रपद महिन्यातील चतुर्थीला महासिद्धीविनायकी चतुर्थी असे म्हणतात, कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यात महाराष्ट्राप्रमाणे भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून गणपतीचा उत्सव साजरा केला जातो, गणेश चतुर्थीची प्रचलित आख्यायिका याप्रकारे आहे की एकदा गणपती चतुर्थीचे स्वतःचे आवडीचे मोदक खाऊन उंदराच्या पाठीवरून जात होते वाटेत साप पाहिल्याने उंदिर भयाने कापू लागला यामुळे गणपती बाप्पा उंदराच्या पाठीवरून खाली पडले हे दृश्य पाहून आकाशातील चंद्र हसू लागला म्हणून गणपती बाप्पाने तुझे चतुर्थीस कोणी दर्शन करणार नाही असा शाप दिला अशी आख्यायिका प्रचलित आहे श्रीगणेश हे हिंदूंचे आद्यदैवत असून सर्व कार्याच्या आरंभी त्याचे पूजन केले जाते गणपती ही ज्ञान आणि बुद्धीची देवता आहेच, त्याचबरोबर ती शौर्याचीदेखील देवता आहे सर्वात महत्त्वाचे म्हणजे इतर कुठल्याही देवतेची पूजा आराधना गणपतीने केली, असे कुठल्याही पुराणात संदर्भ आढळत नाहीत. म्हणून गणपती ही देवता सार्वभौम म्हणून वर्णन केली जाते, कोकणात गणेशोत्सव जोशात साजरा केला जातो श्रीवर्धन मधील काही गणेश मूर्तीचे मनमोहक रूप.
















मोदक देतो मी लाडू देतो या नवीन गणपती बाप्पाचे शूटिंग नुकतेच संपन्न झाले असून श्री गणेश चतुर्थीचे शुभ मुहूर्ताचे औचित्य सादत अहिल्या नगरचे माझी . खासदार सन्माननीय डॉक्टर सुजय दादा विखे पाटील यांच्या हस्ते गाण्याचे पोस्टर लॉन्च करण्यात आले यावेळी सन्माननीय खासदार साहेब यांनी सर्व तुमच्या कलाकारांना गणेश चतुर्थीच्या शुभेच्छा देत हसत प्रसन्न मुद्रेने पोस्टरचे लॉन्च करण्यात आले याप्रसंगी निर्माते आबा निर्मळ निर्माता दिग्दर्शक प्रमोद पंडित. ,पन्हाळे साहेब. गणेश बोकंद ,कलाकार ज्ञानदेव शिंदे या गाण्याचे शूटिंग लोणी निर्मळ पिंपरी रोड येथील सुप्रसिद्ध हॉटेल K .B या सुप्रसिद्ध रेस्टॉरंट च्या परिसरात शूटिंग चे चित्रीकरण करण्यात आले यावेळी हॉटेलचे मालक सचिन दादा आहेर पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले ज्ञानेश्वर साबळे.शिर्डी न्यूज अहिल्यानगर



**वावेघर गृप ग्रामपंचायतीचे सरपंच सौ.गितांजली गुरुनाथ गाताडे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या श्रीगणरायाचे दशन घेतांना पाताडे परिवार**

# अनुशक्तीनगरात मनसेच्या गणेशोत्सव सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(शांताराम गुडेकर) :**
अनुशक्ती नगर विधानसभा क्षेत्रात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे व घरगुती गणेशोत्सवासाठी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. सामाजिक प्रबोधन, व्यसनमुक्ती आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर आधारित या स्पर्धेमुळे अनुशक्तीनगर विधानसभा क्षेत्रात भक्तिमय वातावरणासोबतच सामाजिक संदेशही दिला जात आहे.

नवनिर्वाचित विभागाध्यक्ष रवींद्र शेलार आणि महिला विभागाध्यक्षा अमिता गोरेगावकर यांनी या उपक्रमाचे नेतृत्व केले असून, राज्य उपाध्यक्ष नवीन भाऊ आचार्य आणि माजी विभागाध्यक्ष रवींद्र गवस यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. उपविभागाध्यक्ष सचिन ससाने, विशाल कदम, राजेश पूर्वे, प्रांजल राणे कस्पटे, लक्ष्मी ताई, विद्यार्थी सेनेचे गजेंद्र कांबळे, योगेश घनदाट, रुपेश बोरकर तसेच शाखाध्यक्ष मंगेश पडवळ, संतोष पवार, मदन गाडेकर, प्रसाद सनगरे, जयेश ठाकूर, संदीप बनसोडे, रोहित शेट्टी आदींनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेतले. गणेशोत्सव हा जातीपातीच्या पलीकडे साजरा केला जाणारा महाराष्ट्राचा प्रमुख सण आहे. "जातीपाती मला न कळते, मला न कळे कोणाचा एवढेच माहीत मी महाराष्ट्राचा, महाराष्ट्र माझा" असे विचार व्यक्त करून विभागाध्यक्ष शेलार यांनी राजसाहेब ठाकरे यांच्या शिकवणीवर प्रकाश टाकला. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी प्रथम पारितोषिक ₹५१,०००, द्वितीय ₹२५,००० तर तृतीय ₹१५,००० ठेवण्यात आले आहे. घरगुती गणेशोत्सवासाठी प्रथम पारितोषिक ₹११,०००, द्वितीय ₹७,००० व तृतीय ₹५,००० अशी बक्षिसे जाहीर करण्यात आली असून सर्व सहभागींना विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे. या उपक्रमाचे अभिनंदन मनसे नेते अमित ठाकरे, नितीन सरदेसाई, शिरीष सावंत, योगेश सावंत, कर्णबाळा दुनबळे, राजाभाऊ चौगुले, रीठा गुप्ता व स्नेहल जाधव यांनी केले आहे. पारितोषिक वितरण समारंभ घटस्थापनेच्या दिवशी पार पडणार आहे.



**वृंदावन फ्लोरा रिस येथील निलम सिंग यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाचे दर्शन घेताना सिंग कुटुंबिय**






# महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाची जागतिक दखल

## इंग्लंडच्या ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’ पुरस्काराने सन्मान



महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील विक्रमी लोकसहभागाची आंतरराष्ट्रीयस्तरावर नोंद घेण्यात आली आहे. त्यानिमित्त प्रदान केलेल्या ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’चे प्रमाणपत्र व स्मृतिचिन्हासह महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, संचालक श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर**

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू. नागपूर विदर्भसंपादक**
**मुंबई, 29 ऑगस्ट 2025:** शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानातील विक्रमी लोकसहभागाची जागतिकस्तरावर नोंद घेत इंग्लंडमधील ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’ पुरस्काराने महावितरणचा सन्मान करण्यात आला. या अभियानाचे मार्गदर्शक आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र तसेच अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनाही आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्राने गौरविण्यात आले. मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’चे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह महावितरणच्या वतीने संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार आणि विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांनी स्वीकारले. यावेळी प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. दिवाकर सुकुल (लंडन), प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. मधू कृष्णन (अमेरिका), ज्येष्ठ संपादक व माजी मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराच्या निवड समितीकडून महावितरणच्या विद्युत सुरक्षेच्या लोकाभिमुख अभियानाचे कौतुक करण्यात आले. यामध्ये वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे अध्यक्ष श्री. हेनरी आर (युरोप), प्रमुख श्री. पाब्लो (इंग्लंड), उपाध्यक्ष श्री. संजय पंजवानी, परीक्षक चंद्रशेखर शिंदे यांचा समावेश आहे.

महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील विक्रमी लोकसहभागाची दखल जागतिकस्तरावर घेण्यात आल्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे छोटेखानी बैठकीत कौतुक केले. शून्य विद्युत अपघाताचे उद्दिष्ट हे महावितरणच्या कामाचा दैनंदिन भाग आहे. विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे सातत्याने लोकसंवाद साधून विद्युत सुरक्षेची माहिती देत राहावी असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक श्री. भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांची उपस्थिती होती.

‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’ ही इंग्लंडमधील जागतिकस्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. या संस्थेने महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभाग आंतरराष्ट्रीय विक्रम असल्याची घोषणा केली व मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केला. यावेळी युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, नेपाळ आणि भारतातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

महावितरणने यंदा 20 व्या वर्धापन दिनानिमित्त दि. 1 ते 6जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये तब्बल 2 लाख 11 हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यासह 1 कोटी 92 लाख 79 हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर ‘एसएमएस’द्वारे तर 35 लाख 73 हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला. या अभियानातील लोकसहभागाच्या पाच विक्रमांसाठी महावितरणला एशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थांनी नुकतेच गौरविले आहे. आता या अभियानाच्या लोकसहभागावर आंतरराष्ट्रीय विक्रमाचा शिक्कामोर्तब झाला आहे.

## पूर्व सूचना न देता यावल शहरात व्यवसायिकांचा आणि घरगुती वापराचा वीज पुरवठा खंडित केल्याने जातीय सलोखा धोक्यात

### श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी हजारो नागरिकांच्या घरात अंधार

यावल दि.२८ ( सुरेश पाटील ) वीज वितरण कंपनी,यावल नगरपरिषदेने यावल शहरातील नागरिकांना कोणतीही पूर्व सूचना न देता बुधवार दि. २७ रोजी श्री गणेश स्थापनेच्या दिवशी म्हणजे गणेश चतुर्थीच्या दिवशी संध्याकाळी ७ वाजेपासून तर रात्री १२ वाजेपर्यंत आणि आज गुरुवार दि.२८ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत यावल शहरातील व्यवसायिकांचा / दुकानदारांचा तसेच घरगुती वापरासाठी वीजपुरवठा घेतलेल्या इलेक्ट्रिक तार / वायर कट करून वीज पुरवठा खंडित केल्याने ९० % यावल शहर अंधारात राहिल्याने सर्व समाजात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून अनेकांच्या घरात श्री गणेशाची पूजा विधी करण्यासाठी अडथळा निर्माण झाल्याने संपूर्ण यावल शहराचा जातीय सलोखा, कायदा सुव्यवस्था, शांतता धोक्यात आल्याने यावल नगरपरिषद आणि वीज वितरण कंपनीच्या भोंगळ व नियोजन शून्य कामकाज करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यां विरुद्ध यावल पोलीस काय कारवाई करणार..? आणि कारवाई होऊ नये यासाठी लोकप्रतिनिधी काही हस्तक्षेप करणार का..? याकडे सर्वांचे लक्ष वेधून आहे.याबाबत सविस्तर अशी माहिती की गणेशोत्सव साजरा करण्यासाठी संपूर्ण यावल शहरातील गणेश मंडळाच्या आगमन व विसर्जन मिरवणुकीसाठी यावल नगरपरिषदेने आपल्या यंत्रणेमार्फत काय काय नियोजन केले,तसेच विविध कार्यक्रम घेणाऱ्यांना यावल नगरपरिषद कोणत्या अटी,शर्तीनुसार, नियमानुसार परवानगी देत असते त्यानंतर वीज वितरण कंपनी यावल शहरात वीज पुरवठा सुरळीत राहण्यासाठी काय नियोजन करते इत्यादी अनेक प्रश्न उपस्थित होत असल्याने तसेच संबंधित अधिकारी,कर्मचारी यांनी आपल्या कर्तव्यात कसूर करून बेजबाबदारपणा,हलगर्जीहीपणा केल्याने संपूर्ण यावल शहरातील जातीय सलोखा कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली असल्याने पोलीस आता यांच्याविरुद्ध प्राप्त तक्रारीनुसार काय कारवाई करणार याकडे संपूर्ण यावल करांचे लक्ष वेधून आहे. यावल नगरपरिषद,वीज वितरण कंपनी यांच्या निष्क्रियतेमुळे यावल पोलिसांच्या दैनंदिन कामकाजावर तसेच सर्व जाती धर्माचे विविध धार्मिक सण,उत्सव साजरे करताना यावल शहराला वेठीस धरणाऱ्या विरुद्ध आणि पोलीस यंत्रणेला बदनाम करून त्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या विरुद्ध यावल पोलिसांना कारवाई करू नये म्हणून काही राजकारणी हस्तक्षेप करून आपला प्रभाव पोलिसांवर टाकणार का..? तसेच श्री गणेश विसर्जनाच्या दिवशी सुद्धा यावल शहरातील वीजपुरवठा खंडित होणार आहे का.?याकडे आता यावलकरांचे लक्ष लागून आहे.




## ढोल ताशाच्या गजरात " श्री " चे आगमन

तळणी :- हदगाव तालुक्यातील तळणी निवघा ( बा .) , कोळी , परीसरात गणपती बाप्पा मोरया म्हणत ढोल ताशाच्या गजरात बाप्पाचे आगमन झाले . विविध आकर्षक गणपती बाप्पा च्या मुर्ती गणेश भक्तांनी खरेदी करून ट्रॅक्टर , जिप मध्ये आणले . तर घरी पुजे करीता गणपतीच्या छोट्या छोट्या मूर्ती खरेदी करण्यासाठी भक्तांची गर्दी झाली होती . निवघा बाजार , शिरड , पेवा , मनुला , माटाळा , करोडी , काळेश्वर , शिवपुरी , येळंब , धानोरा , हस्तरा , बोरगाव , वरूला , महाताळा , चक्री , कोळी , मरडगा , भाटेगाव , उमरी , निवळा , तळणी , वाकी , उंचेगाव , आमगव्हाण , इरापुर , शिऊर , साप्ती , कोहळी अदी ठिकाणी मोठ्या उत्साहात " श्री " चे आगमन झाले .

# "पांडे नगर नालीकामात आसारी गायब, स्लॅबला तडे – प्रशासन मात्र डोळेझाक"

## नालीचा ढाळ उलट, स्लॅबवर तडे – कोणाच्या फायद्यासाठी काटकसर?



पांडे नगर नालीकाम – गिट्टीचा लेयर न टाकता केलेलं निकृष्ट काम

**सोयगाव प्रतिनिधी...दिलीप मोरे...**
प्रतिपंढरपूर शेंदुर्णी पंचक्रोशीतील पांडे नगर येथे ओतीव काँक्रिट नालीच्या कामात लाखों रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात हे काम ‘निकृष्ट दर्जाचे’ व ‘काटकसर करून’ सुरू असल्याची ग्रामस्थांमध्ये चर्चा रंगली आहे.नियमाप्रमाणे नाली ओतन्यापूर्वी गिट्टीचा मजबूत लेयर टाकणे आवश्यक असते. परंतु येथे तो केवळ औपचारिकता म्हणून – जसा भाविक एखाद्या सणासुदीला मंदिर परिसरात भात-दही शिंपडतो तसा – केला जात असल्याचे स्थानिकांनी सांगितले. नालीच्या ढाळीबाबतही गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या आहेत. ज्या ठिकाणी पाणी पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहिले पाहिजे, तिथे काम उलट पद्धतीने करून पाणी साचण्याचा धोका वाढवण्यात आला आहे. आसारीच्या पिंजऱ्याखाली आवश्यक असलेले PCC एका बाजूला, तर ओतीव काँक्रिट दुसऱ्याच बाजूला ओतल्याचे स्पष्ट दिसत आहे.ग्रामस्थांनी ताशेरे ओढत म्हटले – “आंधळा दळतो, कुत्रं पिठ खातं” अशी परिस्थिती नालीकामात झाली आहे. नालीच्या वर ओतलेले स्लॅब अनेक ठिकाणी तडकले असून काही ठिकाणी आसारी न लावता केवळ तुकडे टाकून ‘ए क्या है ना’ म्हणत काम उरकले जाते. ग्रामस्थांनी याची तुलना लहान मुलाला फुगा मागितल्यावर पिशवीत हवा भरून देण्यासारखी केली आहे. या सर्व प्रकारामागे कोणाचा तरी राजकीय हात असल्याची शंका ग्रामस्थ व्यक्त करत असून, कंत्राटदार व पोट-ठेकेदारांना मनमानी पद्धतीने काम करण्याची मोकळीक मिळाल्याने कामाचा दर्जा घसरत चालला आहे.ग्रामस्थांनी प्रशासनाला थेट प्रश्न विचारले आहेत –* लाखोंचा निधी आला तरी काटकसर कोणाच्या **फायद्यासाठी केली जाते?**

*** जबाबदार अधिकारी व नगरसेवक या कामाकडे डोळेझाक का करत आहेत?**

*** निवडणुकीच्या वेळी जशी काळजी घेतली जाते, तशी कामाच्या दर्जावर का घेतली जात नाही?दरम्यान, या निकृष्ट दर्जाच्या नालीकामबाबत प्रशासनाने लक्ष वेधून संबंधित कंत्राटदार व पोट-ठेकेदार यांच्याकडून तातडीने स्पष्टीकरण मागवावे आशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.**

> "लाखोंचा निधी आला तरी आम्हाला दिसतंय ते फक्त तडे गेलेले स्लॅब आणि निकृष्ट दर्जाचं काम. हा निधी ग्रामविकासासाठी आहे की कोणाच्या खिशात भरण्यासाठी?"
> --ग्रामस्थ-

# सोयगावात लाचलुचपत विरोधी पथकाची धडक कारवाई – पोलीस कर्मचाऱ्यासह चौघे जाळ्यात

## हॉटेल न्यू मुरलीत रंगेहात कारवाई

सोयगाव प्रतिनिधी..दिलीप मोरे...
लाचलुचपत विरोधी पथकाने गुरुवारी (दि. 28 ऑगस्ट) सोयगाव शहरातील हॉटेल न्यू मुरली येथे सापळा रचून थेट कारवाई केली. या कारवाईत पोलीस ठाण्यात कार्यरत दोन पोलीस कर्मचाऱ्यांसह दोन खाजगी इसमांना ताब्यात घेण्यात आले आहे. तक्रारदाराच्या विरोधातील सोयगाव (ग्रामीण) पोलीस ठाण्यातील एक अर्ज निकाली काढण्यात आला होता. त्या बदल्यात "बक्षीस/मोबदला" म्हणून आलोसे पोलीस कर्मचारी राजू बरडे व रवींद्र तायडे यांनी खाजगी इसम अरविंद राठोड मार्फत तक्रारदाराकडे १५ हजार रुपयांची मागणी केली होती. त्यातील ५ हजार रुपये आधीच फोन पे द्वारे घेण्यात आले होते. उर्वरित रक्कमेपैकी ३ हजार रुपये घेण्यासाठी पुन्हा मागणी होत असल्याची तक्रार लाचलुचपत विभागाकडे दाखल झाली होती.या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर सापळा रचण्यात आला. गुरुवारी दुपारी हॉटेल न्यू मुरली, सोयगाव येथे खाजगी इसम सुनील सोनोने (हॉटेल मालक) याने तक्रारदाराकडून ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने सर्वांना रंगेहात पकडले. या कारवाईत आरोपींकडून मोबाईल फोन, रोकड ३ हजार रुपये ताब्यात



घेण्यात आले असून आरोपींवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या धडक कारवाईत पोलीस निरीक्षक योगेश शिंदे, सापळा अधिकारी वाल्मीक कोरे यांच्या पथकाने सहभाग घेतला. या कारवाईचे मार्गदर्शन पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे, अप्पर पोलीस अधीक्षक शशिकांत शिंगारे, उपअधीक्षक सुरेश नाईकनवरे यांनी केले. लाचलुचपत विरोधी विभागाने जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही शासकीय अधिकारी-कर्मचारी किंवा त्यांच्यामार्फत खाजगी इसम लाचेची मागणी करत असल्यास त्वरित टोल फ्री क्र. १०६४ वर संपर्क साधावा.

# रायझिंग स्टार इंग्लिश स्कूलचे प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश

खुलताबाद प्रतिनिधी
26 एप्रिल रोजी झालेल्या एम. टी. एस. इ ( महाराष्ट्र टॅलेंट सर्च एक्सामिनेशन) प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजने घवघवीत यश संपादन केले. महाविद्यालयाचे चार विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण
तेजल फकीरराव खंडागळे, प्रीती गणेश जाधव, प्रगती विठ्ठल काळे, कार्तिक संतोष लहाने यांनी यश संपादन केले असून विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते त्याप्रसंगी मुख्याध्यापक विश्वंभर नलावडे सर, प्राचार्य योगेश इंगळे, सोपान भोपळे, ऋषी वेताळ, संदीप निकम, अनमोल गवई, अमोल सोळुंके, किशोर गावंडे, मनोज वेताळ, ऋषी जाधव, पूजा नलावडे, सीमा शेळके, कोमल इंगळे, मनीषा गायकवाड, अफ्रिन अत्तार, निकिता खुटे, अलका काथार, वैशाली जाधव, अलका चंदनसे यांनी कौतुक केले.



## हर्षदीप

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**

दिवसामागून दिवस नकळल गेले,
पाहता पाहता नऊ वर्ष तेही संपले,
दहाव्या वर्षात पदार्पणाचा योग आला,
२९ ऑगस्ट सोनियाचा दिवस झाला,
हर्षदीप नाव त्याचे पृथ्वीवरला तारा,
अवतीभवती वाहतो त्याच्या प्रेमळ वारा,
आजी आजोबाच्या कुशीत जसा वाढला,
मामांच्या अतूट प्रेमात संपूर्ण न्हाहला,
जीव की प्राण असे तो मम्मीचा लाडला',
असा लाभला कळमनेरी' प्रेम वर्षाव त्याला,
भविष्य त्याचे उज्ज्वल व्हावे दिवसेंदिवस,
संकटे दूर व्हावी यासाठी करतात रोज नवस,
शिकावा गुणी व्हावा जगात व्हावी ओळख,
कोण कसा ? याची करावी त्याने नित्य पारख,
अहंभाव न यावा अंगी कधीही,
कोणावळी सदैव तयार असावा मदतीचा
येता पाळी, आरोग्य हे सुदृढ राही हीच माझी कामना,
काटे दूर जावे जगताना आयुष्याच्या राना,
महिना ऑगस्ट वर्ष २०२५ हे मदतीचे आहे,
सर्वांची कृपा तुझ्यावर ही समस्त सृष्टी पाहे,
आयुष्य तुझे सुखाचे जावो ही मनोकामना
हर्षदीप तुला देतो रे वाढदिवसानिमित्त शुभेच्छाचा पान्हा.

**कवि**
**राहुल ज्ञानेश्वरराव धवने**
**ज्ञानसागर माध्यमिक विद्यालय,**
**आष्टी,ता.कळंब जि.यवतमाळ.**

# गुन्हेगाराना शिक्षेपर्यंत पोहचविण्यासाठी धुळे पोलिसाच्या हाती आता लॅब व्हॅन

## » ब्लॉक चेन टेक्नॉलॉजीचा प्रत्यक्ष वापर करता येणार

धुळे । प्रतिनिधी ।

**येथील पोलिसांना अत्याधुनिक मोबाईल फॉरेन्सिक लॅब व्हॅन (फिरती न्यायवैद्यक प्रयोग शाळा) प्राप्त झाल्याने आता ब्लॉक चेन टेक्नॉलॉजीचा वापर करून क्राईम सीन ॲप्लिकेशन द्वारे गुन्ह्यांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करता येणार आहे. यामुळे गुन्हेगारांचा पुराव्यासह अचूक माग काढणे पोलिसांना शक्य होईल. धुळे पोलिसांना शासनाकडून प्राप्त झालेल्या या मोबाईल व्हॅनच्या वापराची अनुमती जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी बुधवारी प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दिली.**

> “ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनमुळे पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि अचूक बनणार आहे. तपास यंत्रणा आणि फॉरेन्सिक तज्ज्ञ यांच्यात उत्तम समन्वय साधला जाणार आहे.
>
> **– श्रीकांत धिवरे**
> (जिल्हा पोलीस अधीक्षक, धुळे)

याव्यतिरिक्त आगामी सण,उत्सवाच्या निमित्ताने धुळे पोलिसांना आणखी दोन अद्यायावत २२ आसनाचे वाहन (बस) देण्यात आल्याने या दोन्ही वाहनांची जिल्हा पोलीस अधीक्षक धिवरे यांनी पाहणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पहिल्या फॉरेन्सिक मोबाईल व्हॅनचे जानेवारी महिन्यात मुंबईत लोकार्पण झाले होते. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आवश्यक अशा साहित्याने सज्ज असलेली अशीच एक मोबाईल व्हॅन आता धुळे जिल्हा पोलीस दलासही प्राप्त




झाली आहे. ही फॉरेन्सिक मोबाईल लॅब (व्हॅन) कार्यरत झाल्यास ब्लॉक चेन टेक्नॉलॉजी आणि आर्टिफिशल इंटेलिजन्स म्हणजे ए'आयचा वापर करून क्राईम सीन ॲप्लिकेशनद्वारे गुन्ह्यांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करता येणार आहे. तपासणीदरम्यान मिळालेले पुरावे, रक्ताचे नमुने यांचे योग्यप्रकारे जतन करून बारकोडद्वारे सीसीटीव्हीच्या नजरेखाली ते सुरक्षित करण्यात येऊ शकणार आहेत. फॉरेन्सिक न्यायवैद्यक तज्ज्ञ आणि तांत्रिक सहाय्य म्हणून स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहणार आहे. स्फोटक पदार्थांच्या तपासणीसाठी आवश्यक असणारी व सायबर गुन्ह्याच्या तपासणीसाठी लागणारे साहित्यही या प्रयोगशाळेत असेल. रक्त, डीएनए चाचणी नमुने आणि बलात्कारसारख्या गुन्ह्यात घटनास्थळावरील महत्त्वाचे पुरावे गोळा करता येणार आहेत.

मोबाईल व्हॅनमध्ये सीसीटीव्ही असतील. ते पोलीस कक्षाशी जोडलेले असतील. यामुळे पोलिसांना एखाद्या गुन्ह्यात गोळा केलेल्या पुराव्यांची माहिती लगेच देता येणे शक्य होणार आहे. जेव्हा एखाद्या ठिकाणी गुन्हा नोंदवला जाईल, तेव्हा पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी फॉरेन्सिक पथकाला गुन्ह्यांची माहिती देईल. त्या माहितीच्या आधारे फॉरेन्सिक मोबाईल व्हॅन प्रत्यक्ष घटनास्थळाला भेट देईल. घडलेल्या गुन्ह्याची माहिती नोंदवून क्राईम सीन ॲप्लिकेशनमध्ये त्याची नोंद करण्यात येईल. व्हॅनमधील फॉरेन्सिक तज्ज्ञ गुन्हा घडलेल्या ठिकाणी पोहोचेल आणि घटनास्थळचे छायाचित्र काढून त्याचे चित्रीकरण करण्यात येईल.आवश्यक असल्यास संबंधित अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे (दूरदृश्य प्रणाली) चर्चा होऊ शकेल. तपास यंत्रणेच्या हाती थेट अचूक आणि ठोस पुरावाच मिळणार असल्याने काहीकेल्या संशयित गुन्ह्यातून सहज वाचणार नाहीत, असे स्थानिक गुन्हे अन्वेशन विभागाचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांनी सांगितले.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ५०लाखांची उलाढाल

## विविध गणेश मंडळ घरोघरी गणरायाचे आगमन, शहरात उत्साहाचे वातावरण

शिंदखेडा । प्रतिनिधी ।

शहरामध्ये ढोल ताशे व डीजेच्या गजरात विविध मंडळ व घरोघरी गणरायाचे आगमन झाले. गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला व स्थापनेच्या दिवशी शहराच्या स्टेशन रोडवर गणेश मूर्ती खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. गणेश मूर्ती सोबतच देखाव्यासाठी लागणारे साहित्य देखील खरेदी करण्यासाठी गर्दी झाली होती. शहरात गणेशोत्सवाच्या निमित्ताने दोन दिवसात जवळपास ५० लाख रुपयांपेक्षा अधिकची उलाढाल झाली आहे.

शहरांमध्ये गल्लीनिहाय व कॉलनी परिसरात विविध गणेश मंडळांनी गणेशाची स्थापना केली आहे. यंदा मोठ्या गणेश मंडळांनी जवळपास एक आठवडा अगोदरच गणरायाच्या आगमन सोहळा मोठ्या दिमाखदार पद्धतीने साजरा केला आहे. व काल गणेश चतुर्थीच्या दिवशी गणरायाची स्थापना करण्यात आली.



शहरात स्टेशन रोड वर पंधरा ते वीस गणेश मूर्ती विक्रेत्यांनी दुकानं थाटली होते. शहरामध्ये जवळपास चार हजार घरं असून प्रत्येक घरी कमीत कमी दोनशे रुपये किमतीची गणेश मूर्ती खरेदी करण्यात आली आहे. गणेश मूर्ती, देखावा साहित्य, व मंडळांनी स्थापन केलेली गणेश मूर्ती व देखावे यातून शहरात सुमारे ५० लाखांची उलाढाल झाली आहे. शहरातील विविध मंडळांनी भव्य मूर्ती स्थापित केल्या आहेत.

जनता हायस्कूल मध्ये गणरायाचे आगमन--

शिंदखेडा येथील जनता हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात भारतीय संस्कृतीत महत्त्वाचा मानला जाणारा उत्सव श्री गणेश चतुर्थी या निमित्ताने संस्थेचे संचालक प्रा. जितेंद्र गोरख पाटील यांच्या शुभहस्ते सहपत्नीक श्री गणेशाची विधिवध स्थापना करण्यात आली.

कार्यक्रम प्रसंगी संस्थाध्यक्ष मनोहर पाटील, उपाध्यक्ष अमजद मेहमूद कुरेशी, खजिनदार देवेंद्र पोपटराव बोरसे, सचिव श्रीमती मिरा मनोहर पाटील, प्राचार्य एस एस पाटील, पर्यवेक्षक बी जे पाटील, एस के जाधव ,डी एच सोनवणे एस ए पाटील ज्येष्ठ लिपिक किशोर पाटील तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शालेय परिसरात गणपती उत्सव साजरा होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण होते या उत्साहात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व कलागुणांना वाव मिळावा म्हणून सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध शालेय स्पर्धेचे आयोजन शालेय स्तरावर करण्यात येणारआहे. अतिशय आनंदमय वातावरणात गणेश आरती करत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# गणेशोत्सव सोडाच, ‘खड्डोत्सवाला’ प्रारंभ

नवापूर । प्रतिनिधी ।

शहरात गणपती बाप्पाचे आगमन मोठ्या जल्लोषात झाले. ढोल-ताश्यांचा गजर, रोषणाई आणि भक्तांचा उत्साह यामुळे शहरात आनंदाचे वातावरण आहे. मात्र या आनंदावर पाणी फेरले ते शहरातील खड्ड्यांनी. मुख्य रस्त्यांपासून गल्लीबोळांपर्यंत खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यांची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. मोटारसायकलस्वार वारंवार अपघाताच्या भीतीत प्रवास करत आहेत. विशेषत: शाळकरी मुले आणि महिला प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

शहरातील गणेश मंडळांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत नगरपालिकेकडे खड्डेमुक्त रस्त्यांची मागणी केली होती. परंतु, नगरपालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले. आश्चर्य म्हणजे, नगरपालिकेच्या इमारतीच्या



परिसरात व इतर ठिकाणी मात्र तातडीने रस्ते डांबरीकरणाचे काम करण्यात आले. त्यामुळे नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला असून, “सार्वजनिक रस्ते जनतेसाठी आहेत की फक्त निवडक ठिकाणीच काम होणार?” असा प्रश्न विचारला जात आहे.

गणेश भक्तांचे म्हणणे आहे की, प्रत्येक वेळी फक्त बैठकीत आश्वासने मिळतात, पण प्रत्यक्षात काहीही घडत नाही. निवडणुकीच्या काळात दिलेल्या “खड्डेमुक्त शहर” या घोषणांचा पत्ता लागलेला नाही. यामुळे गणपती उत्सवाच्या काळातही नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

गणेशभक्तांनी बाप्पाच्या चरणी प्रार्थना केली की, “नवापूर शहरातील खड्ड्यांचे ग्रहण आता तरी दूर व्हावे आणि सुरक्षित रस्त्यांची सोय व्हावी.”

> **नवापूरच्या नगरपालिकेला आता विचारायला हवं**
>
> ● खड्ड्यांमध्ये शहर बुडवायचं ठरवलंय का? स्वतःच्या इमारतीभोवती डांबर टाकायला वेळ आहे, पण जनतेच्या जीवावर उठलेले रस्ते मात्र खड्ड्यांतच सोडले.
>
> ● “खड्डेमुक्त शहर” दाखवायचं आणि प्रत्यक्षात नागरिकांना खड्ड्यांमध्येच ढकलायचं – ही विकासाची नवी व्याख्या नगरपालिकेने दिली आहे. गणपती बाप्पा आलाय, पण नवापूरकर विचारताहेत
>
> ● “बाप्पा, आता तरी या नगरपालिकेला थोडी अक्कल दे... नाहीतर आमचं शहर कायमच खड्ड्यात जाणार आहे.”

# शिवाजी हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालय गणेश मंडळाची गणपती स्थापना

## मुलींच्या लेझीम नृत्याने मिरवणुकीला रंगत

नवापूर । प्रतिनिधी ।

म नवापूर शहरातील श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय गणेश मंडळाच्या प्रथम मानाच्या गणेश स्थापनेचा उत्सव यंदाही ढोल-ताशांच्या गजरात, जयघोषाच्या निनादात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. गणेश मंडळाच्या या पारंपरिक स्थापनेसाठी शहरातील नागरिकांमध्ये वेगळाच उत्साह पाहायला मिळाला.

प्रथेनुसार, सकाळी सराफ गल्लीतील लक्ष्मीनारायण मंदिरात पूजेच्या गणपती बाप्पाची पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर सजवलेल्या आकर्षक रिक्षेत बाप्पाला विराजमान करून मिरवणुकीची सुरुवात झाली. पुढे मुलींच्या लेझीम पथकाने दमदार तालावर केलेले नृत्य संपूर्ण मिरवणुकीचे मुख्य आकर्षण



> **गणेशोत्सवात विद्यार्थी- शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग**
>
> श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय गणेश मंडळाच्या मिरवणुकीत मुलींच्या लेझीम पथकाने आपली परंपरा जपत लक्ष वेधले. विशेष म्हणजे या मिरवणुकीत शिक्षिका भगिनींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीही उत्साहाने सहभागी झाले. शैक्षणिक वातावरणातही भक्ती व सांस्कृतिकतेचा संगम घडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

ठरले. लेझीमच्या तालावर “गणपती बाप्पा मोरया”चा घोष घुमताच परिसरात उत्साहाचे वातावरण पसरले.

मुख्य मार्गावरून मिरवणूक जात असताना नागरिकांनीही फुलांच्या उधळणीतून बाप्पाचे स्वागत केले. मार्गावरील श्री गणपती मंदिरात थांबून बाप्पाची पूजा व आरती करण्यात आली. त्यानंतर मिरवणूक पुढे सरकत श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात पोहोचली. येथे विधिवत पूजन व आरती करून गणेश स्थापना पार पडली. स्थापनेनंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले.

या भव्य मिरवणुकीत गणेश मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार यांसह प्राचार्या, पर्यवेक्षक, मिरवणूक प्रमुख, शिक्षक, शिक्षिका भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिकांनीही मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. गणेश मंडळाने शहरात लेझीम नृत्याची सुरुवात करून दिलेली परंपरा आजही कायम ठेवली आहे. त्यामुळे मुलींनी दिलेल्या सादरीकरणाने गणेश मिरवणुकीला खास वेगळेपण लाभले.

# धुळ्यात बनावट मद्य कारखाना उद्ध्वस्त

## श्रीकांत धिवरे : सहजीवननगरातून पावणेदोन लाखांचा मुद्देमाल जप्त

धुळे । प्रतिनिधी ।

येथील 'एलसीबी'च्या पथकाने शासकीय डेअरी परिसरातील सहजीवननगरात बनावट मद्यनिर्मितीचा कारखाना मंगळवारी (ता. २६) उद्ध्वस्त केला. यात पावणेदोन लाखांचा मुद्देमाल जप्त झाला. स्वमालकीच्या घरात संशयिताकडून कारखाना सुरू होता. या गुन्ह्यातील सराईत संशयितावर विविध पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.



करताना 'एलसीबी'चे श्रीराम पवार. शेजारी पथकातील कर्मचारी.

अवैध व्यवसाय, बनावट मा प्रकरणी कारवाईचे निर्देश जिल्हा पोलिस अधीक्षकांनी दिले आहेत. अशात एलसीबीचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांना सहजीवननगरात गणेश नारायणराव निकम (वय ५२, रा.

प्लॉट नंबर १२) घरात बेकायदेशीर देशी, विदेशी बनावट मद्य तयार करून विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पथकाने छापा टाकला असता, तीन ड्रममध्ये दीडशे रुपये प्रतिलिटरप्रमाणे ९० हजारांचे सहाशे लिटर स्पिरीट, धुळे सहजीवननगरात उद्ध्वस्त केलेल्या बनावट मद्यनिर्मिती कारखान्यातील जप्त साहित्याची पाहणी

सात कॅनमध्ये २१० लिटर स्पिरीट, १५ हजारांचे बूच पॅकिंगचे मशीन, निरनिराळ्या नामांकित मद्य कंपन्यांचेनिळ्या व काळ्या रंगाचे बूच, स्टैंड, पाण्याची टाकी, बाटल्या, टिस्को टेप, चॉकलेटी रंगाचे रसायन आदी मिळून एक लाख ६८ हजार किमतीचा मुद्देमाल आढळला. तो जप्त करण्यात आला.

या प्रकरणी संशयित गणेश निकम याच्यावर धुळे शहर, चाळीसगाव रोड पोलिस ठाण्यात वेळोवेळी गुन्हे दाखल आहेत. एलसीबीच्या पथकाने बनावट कारखाना उद्धवस्त करत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक धिवरे, अप्पर अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात एलसीबीचे पोलिस निरीक्षक पवार, उपनिरीक्षक अमित माळी, अंमलदार मच्छिंद्र पाटील, हेमंत बोरसे, प्रल्हाद वाघ, योगेश चव्हाण, हवालदार शिला सूर्यवंशी, हर्शल चौधरी आदींनी केली.